

मुंबई : वेस्टर्न एक्सप्रेस हायवेवर गुरुवारी अभुतपूर्व वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. यामुळे नागरिकांचे खूप हाल झाले. वांद्रे, खेरवाडी, वाकोला, विलेपार्ले, अंधेरी या सर्व परिसरात रस्त्यावर वाहनांचा लांबच लांब रांगा पाहायला मिळाल्या.


रायगड, नवी मुंबई

◆ वर्ष १८ ◆ अंक १५२

www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ शुक्रवार, १९ डिसेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


## अंतरंग


मुंबई-गोवा महामार्गावर तरूणाचा पायी प्रवास/२

महाबळेश्वरकडे जाणारी बस आंबेनळी घाटात कलंडली/५

निवडणुकीसाठी नवी मुंबई महापालिका सज्ज/६



# शेकापचे माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या संस्थेची शाळा बेकायदा

## पुरुषोत्तम भोईर, मुख्याध्यापिका रूपा शेट्टी यांच्यावरही गुन्हा दाखल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आशाप्रभा न्यू इंग्लिश स्कूल या संस्थेचे अध्यक्ष बाळाराम पाटील, स्थानिक स्कूल कमिटीचे अध्यक्ष पुरुषोत्तम भोईर तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका रूपा जिवन शेट्टी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बेकायदा शाळा सुरू करून विद्यार्थी व त्यांच्या पालकांची आणि शासनाची गंभीर फसवणूक केल्याबद्दल प्रशासनाकडून खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शासनाची मान्यता नसताना चालविल्या जाणाऱ्या अनधिकृत शाळांवर कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला. (पान २ वर..)



### अनधिकृत शाळांवर होणार कठोर कारवाई

पनवेल तालुक्यातील इतर अनधिकृत शाळांवरही यापुढे कठोर कारवाई करण्यात येणार असून, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असे गट शिक्षणाधिकारी कार्यालयाने स्पष्ट केले आहे. तसेच पालकांनी आपल्या पाल्यांचा प्रवेश केवळ शासनमान्य शाळांमध्येच घ्यावा व शाळेची मान्यता, UDISE कोड व शासकीय नोंदणी तपासूनच प्रवेश घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

**लोकांची फसवणूक करणे हा पुरुषोत्तम भोईर याचा फंडाच आहे. त्याने विविध अनेक प्रकरणात लोकांची फसवणूक केली आहे. भावी पिढीच्या आयुष्याच्या दृष्टिकोनातून शिक्षण ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. जमीन जागेच्या फसवणूक करण्याबरोबर त्याने आता शिक्षणाच्या पवित्र कामातही घोटाळा केला आहे. विद्यार्थ्यांचे भविष्य त्याने टांगणीला लावून मोठी फसवणूक केली आहे. त्याने पालकांची माफी मागून आणि विद्यार्थी व पालकांचे शैक्षणिक व आर्थिक नुकसानाची भरपाई करून दिली पाहिजे.**

**–प्रमोद भिंगारकर, सरपंच, विचुंबे**

# मराठवाड्यात काँग्रेसला धक्का! प्रज्ञा सातव यांचा भाजपत प्रवेश

**मुंबई : प्रतिनिधी**

काँग्रेस नेत्या आणि विधान परिषद सदस्य प्रज्ञा सातव यांनी गुरुवारी (दि.१८) भाजपत प्रवेश केला. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यावेळी उपस्थित होते. भाजप प्रवेश करण्यापूर्वी प्रज्ञा सातव यांनी विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांच्याकडे सदस्यत्वाचा राजीनामा सुपूर्द केला.

लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचे निकटवर्तीय आणि काँग्रेसचे नेते दिवंगत राजीव सातव यांच्या प्रज्ञा या पत्नी होत. मराठवाड्यातल्या हिंगोली जिल्ह्यातल्या प्रज्ञा सातव २०२१ मध्ये पहिल्यांदा विधान परिषदेवर निवडून गेल्या. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आता पुन्हा एकदा पक्षांतराला वेग आला आहे. भाजपमध्ये जोरदार इनकमींग सुरू झालं आहे. गुरुवारी काँग्रेसच्या नेत्या प्रज्ञा सातव यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. हा हिंगोलीमध्ये काँग्रेसला मोठा धक्का मानला जात आहे.

दुसरीकडे सोलापूर जिल्ह्यातले विधानसभेचे माजी आमदार दिलीप माने यांनीही भाजपत प्रवेश केला आहे. माजी आमदार दिलीप माने यांच्यासह सोलापूर महानगरपालिकेचे माजी नगरसेवक



### अनेकांच्या हाती 'कमळ'


जयकुमार माने, नागेश ताकमोगे, दादाराव ताकमोगे, प्रथमेश पाटील, आनंद देटे, पृथ्वीराज माने, धनंजय भोसले, प्रा.सतीश दरेकर, श्रीकांत मेलगे-पाटील यांनीही भाजपमध्ये प्रवेश केला.

शिवसेना ठाकरे गटालादेखील भाजपने मोठा धक्का दिला आहे. चंद्रपूरमधून युवा नेतृत्व म्हणून ओळख असलेले, पूर्व विदर्भ युवासेना सचिव तसेच विदर्भातील पहिले आणि एकमेव गोंडवाना विद्यापीठ सिनेट सदस्य निलेश बेलखेडे यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. तर पिंपरी चिंचवडमध्ये ठाकरे सेनेचे पिंपरी चिंचवड शहराचे अध्यक्ष संजोग वाघेरे यांनी पदाचा राजीनामा दिला आहे. ते लवकरच भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत.

# जगप्रसिद्ध शिल्पकार राम सुतार यांचे निधन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिल्पकार राम सुतार यांचे गुरुवारी (दि.१८) उत्तर प्रदेशात नोएडा येथे वृद्धापकाळाने निधन झाले. ते १०० वर्षांचे होते. सुतार यांनी २०० हून अधिक भव्य पुतळे उभारून भारताच्या शिल्पकलेला आंतरराष्ट्रीय स्तरावर ख्याती मिळवून दिली. गुजरातमधला स्टॅच्यू ऑफ युनिटी हा सरदार वल्लभभाई पटेल यांचा भव्य पुतळा त्यांनी उभारला होता.



राम सुतार यांनी आतापर्यंत संसद भवनाच्या आवारातील अनेक नेत्यांच्या मूर्ती घडवल्या. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा अनेक दिग्गजांच्या शिल्पांची त्यांनी निर्मिती केली आहे. फ्रान्स, इटली, अर्जेंटिना, रशिया, इंग्लंड या ठिकाणीही त्यांनी साकारलेली शिल्प उभी आहेत. शिल्पकलेतल्या योगदानाबद्दल सुतार यांना नुकतेच महाराष्ट्र भूषण पुरस्कारानं गौरवण्यात आले होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुतार यांना शोकसंदेशातून श्रद्धांजली वाहिली आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्र्यांनीही सुतार यांच्याबद्दल शोक व्यक्त केला.

# पनवेल मनपा निवडणूक प्रभारीपदी लोकनेते रामशेठ ठाकूर तर प्रमुखपदी आमदार महेश बालदी यांची नियुक्ती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची निवडणूक प्रभारीपदी तर आमदार महेश बालदी यांची निवडणूक प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे.





आपल्या संघटन कौशल्याने भाजपचे जास्तीत जास्त उमेदवार निवडून येण्याकरिता सर्वांना सोबत घेऊन अथक परिश्रम कराल, असा विश्वास भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी दिलेल्या दोघांच्याही नियुक्तीपत्रातून व्यक्त करण्यात आलेला आहे. दरम्यान, पक्षाच्या या महत्त्वपूर्ण जबाबदारीसाठी नियुक्ती झाल्याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी प्रदेशाध्यक्ष चव्हाण तसेच पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाचे आभार मानले आहेत. पक्षाने टाकलेला विश्वास प्रामाणिक मेहनत व नियोजनातून निश्चितच सार्थ ठरवू तसेच पक्षाच्या सर्व पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते व नागरिकांच्या सहकार्याने ही निवडणूक यशस्वीपणे पार पाडण्याचा संकल्प लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी व्यक्त केला आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे पक्ष संघटनेत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## निवडक

### छत्तीसगडमध्ये सुरक्षा दलांच्या कारवाईत तीन नक्षली ठार

**छत्तीसगड :** येथील सुकमा जिल्ह्यात सुरक्षा दलांच्या कारवाईत तीन नक्षली मारले गेले. गोलापल्ली पोलीस ठाणे परिसरात सुरक्षा दलाचे जवान आणि नक्षलींमधे चकमक सुरू झाली, यात तीन नक्षलींचा मृत्यू झाला. छत्तीसगड राज्यात या वर्षभरात २८४ नक्षली चमकमीकत मारले गेल्याचं सुरक्षा दलानं म्हटलं आहे.

### प्रियंका गांधींनी मंत्री नितीन गडकरींची घेतली भेट

**नवी दिल्ली :** वायनाडच्या काँग्रेस खासदार प्रियांका गांधी वाड्रा यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली. या भेटीत वायनाड लोकसभा मतदारसंघातील रस्ते, पायाभूत सुविधा आणि संबंधित विकासकामांबाबत सविस्तर चर्चा झाल्याची माहिती आहे. वायनाडमधील राष्ट्रीय महामार्ग, संपर्क व्यवस्था मजबूत करणे आणि प्रलंबित प्रकल्पांना गती देण्यावर बैठकीत भर देण्यात आला.

### 'धुरंधर'ने बॉक्स ऑफिस गाजवले; कोट्यवधींची कमाई

**मुंबई :** सध्या बॉक्स ऑफिसवर गाजत असलेली स्पाय अ‍ॅक्शन थ्रीलर फिल्म 'धुरंधर' चित्रपटाला रिलीज होऊन तेरा दिवस झालेत, यात सिनेमाने धुवांधार कमाई केली आहे. दुसऱ्या आठवड्यातही ३० कोटींपेक्षा जास्त कमाई केली आहे.

# मुंबई, नागपूर न्यायालयांना बॉम्बने उडवण्याची धमकी

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील सर्वाधिक गजबजलेल्या शहरांपैकी एक असलेल्या मुंबई शहरातील वांद्रे न्यायालयाला आज एका ईमेलद्वारे बॉम्बने उडवण्याची धमकी देण्यात आली आहे. धक्कादायक म्हणजे आजचं सकाळी नागपूर न्यायालयालाही बॉम्बने उडवण्याची धमकी ईमेल द्वारे मिळाली आहे. दोन्ही महत्त्वाच्या आणि गजबजलेल्या ठिकाणी बॉम्ब ठेवल्याचे मेल आल्याने पोलीस यंत्रणा खडबडून जागी झाली असून पुढील तपास करत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी (दि.१८) वांद्रे न्यायालयाला एका ईमेलद्वारे बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाली. या धमकीचा मेल आल्यानंतर स्थानिक पोलीस पथके आणि बॉम्ब शोधक आणि नाशक पथके घटनास्थळी दाखल झाली. या अलर्टनंतर मुंबई पोलिसांनी तातडीने सुरक्षा तपासणी सुरू केली आणि परिसरात सतर्कता वाढवली.

खबरदारीचा उपाय म्हणून, न्यायालयीन कामकाज स्थगित करण्यात आले आणि वकील, कर्मचारी आणि अभ्यागतांच्या सुरक्षिततेसाठी प्रभावित न्यायालय परिसर रिकामा करण्यात आला. शिवाय, पोलीस अधिकाऱ्यांनी या परिसरांना वेढा घातला आहे आणि सुरक्षा व्यवस्था कडक केली आहे, तर सायबर पथके धमकी देणाऱ्या ईमेलचा स्रोत शोधण्यासाठी काम करत आहेत.आतून कोणालाही बाहेर जाण्याची परवानगी नाही आणि बाहेरून कोणालाही आत येण्याची परवानगी नाही, तरीही परिसरातील परिस्थिती चिंताजनक असल्याचे समोर आले आहे.

दुसरीकडे नागपूर जिल्हा आणि सत्र न्यायालयाला इमारतीच्या आत बॉम्ब असल्याचा दावा करणारा ईमेल मिळाला. या धमकीमुळे स्थानिक पोलीस तातडीने घटनास्थळी पोहचले आणि परिसराची पाहणी सुरु केली मात्र अद्याप कोणतीही संशयास्पद वस्तू आढळलेली नाही, असे पोलिसांनी म्हटले आहे.

# 'राम-जी' विधेयक लोकसभेत मंजूर!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

### विरोधकांचा सभागृहात राडा

देशातील ग्रामीण जनतेला दोन दशके रोजगाराची हमी देणाऱ्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे नाव आणि स्वरूप बदलणारं 'व्हीबी-जी राम-जी' विधेयक लोकसभेत मंजूर झाले आहे. विरोधी पक्षांनी या विधेयकाला सभागृहात कडाडून विरोध केला.

नव्या रोजगार हमी योजनेतून 'महात्मा गांधी' हे नाव वगळण्यात आले असून या योजनेचे 'विकसित भारत गॅरंटी फॉर रोजगार अँड अजीविका मिशन' (व्हीबी-जी-राम-जी) असे नामांतर करण्यात आले आहे.

या विधेयकावरच्या चर्चेला उत्तर देताना केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान म्हणाले की, ग्रामीण विकास हा त्यांच्या धोरणाचा गाभा आहे. आधीच्या यूपीए सरकारने केवळ २ लाख १३ हजार कोटी रुपये खर्च केले होते, मात्र रालोआ सरकारने आठ लाख ५३ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च केल्याचं चौहान म्हणाले.

# 'भारत-ओमान व्यापाराने नवी दिशा आणि गती मिळेल'

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत-ओमान व्यापार शिखर परिषद दोन्ही देशांच्या भागीदारीला एक नवी दिशा आणि गती देईल, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. ते आज ओमानची राजधानी मस्कत इथं शिखर परिषदेला संबोधित करत होते.

ओमान आणि भारत प्राचीन काळापासून एकमेकांसोबत व्यापार करत आहेत, अरबी समुद्र दोन्ही देशांना जोडणारा पूल म्हणून काम करतो असे प्रधानमंत्री म्हणाले. दोन्ही देशांची मैत्री प्रत्येक काळात मजबूत होत असून हे नातं विश्वासाच्या पायावर उभं असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. दोन्ही देशातील आर्थिक भागीदारीमुळे व्यापाराला नवी गती मिळेल, गुंतवणुकीदारांच्या मनात विश्वास निर्माण होईल आणि, प्रत्येक क्षेत्रात संधीची नवी दारं उघडली जातील, असा विश्वास पंतप्रधानांनी व्यक्त केला.

विविध क्षेत्रात भारत-ओमान सहकार्य मजबूत करणं आणि धोरणात्मक भागीदारी वाढवणं यावर उभय नेत्यांनी चर्चा केली. दरम्यान, द्विपक्षीय संबंध दृढ करण्यात दिलेल्या योगदानाबद्दल ओमान सरकारकडून पंतप्रधान मोदींना 'ऑर्डर ऑफ ओमान' या सर्वोच्च नागरी सन्मानाने गौरवण्यात आले.

# माणिकराव कोकाटेंचा राजीनामा स्वीकारला

**मुंबई : प्रतिनिधी**



बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय सदनिका मिळवल्याप्रकरणी नाशिक सत्र न्यायालयाने दोन वर्षांची शिक्षा कायम ठेवल्यानंतर क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांनी मंगळवारी नैतिकतेच्या आधारावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे राजीनामा सुपूर्द केला होता. अजित पवार यांनी गुरुवारी तो स्वीकारून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मंजुरीसाठी पाठवला.

कोकाटे यांनी सत्र न्यायालयाच्या निर्णयाविरोधात बुधवारी उच्च न्यायालयात धाव घेतली, मात्र न्यायालयाने तातडीच्या सुनावणीस नकार दिल्याने, त्यांच्या अडचणीत वाढ झाली. कोकाटे यांच्या विरोधात अटक वॉरंट जारी झाल्याने, त्यांच्याकडील खाते काढून घेण्याची शिफारस बुधवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्याकडे केली. त्यानुसार, कोकाटे यांच्याकडील खाते काढून ते अजित पवार यांच्याकडे सोपविण्यात आले. त्यानंतर, कोकाटे यांचा राजीनामा स्वीकारून तो मंजुरीसाठी मुख्यमंत्र्यांकडे पाठवल्याची माहिती अजित पवार यांनी गुरुवारी समाज माध्यमांद्वारे दिली.

## सुक्या मासळीला पसंती



**मुरूड : दिवाळीनंतरच्या पर्यटन हंगामात सुक्या मासळीची मोठ्या प्रमाणात विक्री झाली, म्हणून येणाऱ्या आणखी पर्यटकांसाठी मासळी सुकवण्याचे काम सुरू आहे. पावसाळ्यामध्ये मासळी कमी प्रमाणात मिळत असल्याने खवय्यांना सुक्या मासळीचा पर्याय असतो.** (छाया : सुधीर नाझरे)

## नगरपालिका व नगरपंचायत निवडणूक

# उद्या २४ ठिकाणी होणार मतदान

**मुंबई : प्रतिनिधी**

न्यायालयीन प्रकरणांमुळे निवडणूक स्थगित झालेल्या नगरपालिका व नगर पंचायतच्या अध्यक्ष, सदस्य आणि काही ठिकाणी केवळ सदस्य पदांसाठी २० डिसेंबरला मतदान होणार आहे. यामध्ये अकोला जिल्ह्यातील बाळापूर, तर वाशीम जिल्ह्यातील वाशीम व रिसोड येथील काही प्रभागांचा समावेश आहे.



१६ जिल्ह्यांतील २४ नगर परिषदांसाठी २० डिसेंबरला मतदान होणार आहे. यात अंबरनाथ, ठाणे, कोपरगाव, देवळाली, प्रवरा, पाथर्डी, नेवासा; अहिल्यानगर, बारामती, फुरसुंगी, उरळी देवाची, पुणे, अनगर, मंगळवेढा, सातारा- सोलापूर, महाबळेश्वर, फलटण-सातारा, फुलंब्री- छ. संभाजी नगर, मुखेड, धर्माबाद- नांदेड, निलंगा, रेणापूर-लातूर, अंजनगाव, सुर्जी- अमरावती, वसमत-हिंगोली, बाळापूर-अकोला, यवतमाळ, वाशिम, देऊळगावराजा-बुलढाणा, देवळी-वर्धा, घुग्घुस-चंद्रपूर अशा २४ ठिकाणी २० डिसेंबरला मतदान होणार आहे. २१ डिसेंबरला लागणाऱ्या निकालांकडेही सगळ्यांचे लक्ष लागून राहिलं आहे.

राज्यातील २६४ नगरपालिका व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी २ डिसेंबरला मतदान झाले. सुधारित निवडणूक कार्यक्रमानुसार २४ नगरपालिका व नगरपंचायतींच्या अध्यक्षपदांसह सर्व सदस्यपदांसाठी आणि ७६ नगरपालिका व नगरपंचायतींमधील १५४ सदस्यपदांच्या जागांसाठी २० डिसेंबर रोजी मतदान होणार आहे.

# रायगडच्या तरुणाचा मुंबई-गोवा महामार्गावर पायी प्रवास; ५९ धोकादायक ठिकाणे शोधली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्गावर तरूणाने ४९० किमी पायी प्रवास करुन ५९ धोकादायक ठिकाणे शोधून काढली. रस्त्यावर असलेले खड्डे, खराब रस्ते, रस्त्यांचे अर्धवट राहिलेले काम, सर्व्हिस रस्त्यांचे व पुलांचे अपूर्ण काम याबाबत त्यांने एक अहवाल तयार करून तो केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना दिला आहे. रायगड जिल्ह्यातील चैतन्य पाटील यांनी 'रस्ता सत्याग्रह पायी पाहणी मोहीम' सुरू केली होती. त्यांनी ९ ऑगस्ट रोजी पळस्पे येथून मोहीमेला सुरूवात केली. मुंबई गोवा महामार्गावर ४९० किमीचा पायी प्रवास केला. रस्त्यावर असलेले खड्डे, खराब रस्ते, रस्त्यांचे अर्धवट राहिलेले काम, सर्व्हिस रस्त्यांचे व पुलांचे अपूर्ण काम याबाबत त्यांनी एक अहवाल तयार केला. फोटो,





व्हिडिओ व जीपीएस टॅग यांचा पाटील यांनी अहवालात वापर केला. तसेच महामार्गावरील धोक्यांबाबत व्हिडिओ बनवून त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट केले आहेत. वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन त्यांनी वाहनचालकांना केले. मुंबई-गोवा महामार्गावर अपघात टाळण्यासाठी मोहीम हाती घेतल्याचे चैतन्य पाटील यांनी सांगितले. चैतन्य पाटील यांना ४९० किमीचा प्रवास करण्यासाठी २९ दिवसांहून अधिक कालावधी लागला. या प्रवासावेळी त्यांना महामार्गावर काही त्रुटी आढळून आल्या. तसेच महामार्गावरील ५९ धोकादायक ठिकाणे त्यांनी निश्चित केली आहेत. त्या ठिकाणांवरील समस्या सोडवणे प्रशासनाला सोपे जावे यासाठी पाटील यांनी 'जीपीएस टॅग'चा वापर केला आहे. त्यामुळे अधिकारी-कर्मचाऱ्यांना धोकादायक ठिकाणांचे लोकेशन सहज कळणार आहे.

**म्हणून पायी पाहणी मोहीम सुरू केली :**

चैतन्य पाटील हे रायगड जिल्ह्यातील रहिवासी असून त्यांनी इंजीनियरिंगचे शिक्षण घेतले आहे. मुंबई-गोवा महामार्गाचे काम सुरू असलेले त्यांनी लहानपणी पाहिले होते. त्यांनी या महामार्गावर अनेक अपघातदेखील पाहिले आहेत. तसेच या महामार्गाच्या रखडलेल्या कामांमुळे वाहनचालकांना होणारा त्रास त्यांनी अनुभवला आहे. वाहनचालकांचा अपघात होऊ नये, त्यांना जीव गमवावा लागू नये यासाठी मी पायी प्रवास सुरू केला, असे चैतन्य पाटील म्हणाले.

दरम्यान पाटील यांनी तयार केलेला अहवाल खासदार अरविंद सावंद यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना सुपूर्द केला आहे.

# ड्रग्जप्रकरणी एकाला अटक

**नवी मुंबई : बातमीदार**

अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सच्या कोकण कृती विभागाने २१ लाखाचे एमडी व एमडीएमए ड्रग्ज जप्त केले आहे. याप्रकरणी एका नायझेरियन व्यक्तीला अटक केली आहे.

एपीएमसी आवारात एक विदेशी व्यक्ती ड्रग्ज घेऊन विक्रीसाठी येणार असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सच्या पथकाला मिळाली होती. त्यावरून उप अधीक्षक रामचंद्र मोहिते यांनी पथक नेमले होते. पथकाने १५ डिसेंबरला रात्री सापळा रचला असता विदेशी नागरिकाने दुचाकी सोडून पळ काढला होता. तर त्याच्या दुचाकीच्या झडतीमध्ये १७लाखाचे एमडी व एमडीएमए ड्रग्ज मिळून आले होते.

याप्रकरणी एपीएमसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून विदेशी नागरिकाचा शोध सुरू केला. मंगळवारी कोपरखैरने येथील त्याच्या राहत्या ठिकाणी छापा टाकला. यावेळी घरात ४ लाख रुपये किमतीची एमडी ड्रग्ज मिळून आले. अनेय चिनेडू (४०) यास टास्क फोर्सच्या पथकाने त्याला अटक केली आहे.

# जिल्हाधिकारी किशन जावळे यांची स्ट्राँगरुमला भेट

**अलिबाग: रामप्रहर वृत्त**

अलिबाग नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५ च्या अनुषंगाने मतपेट्या ठेवण्यात आलेल्या जनरल अरुणकुमार वैद्य माध्यमिक विद्यालय, अलिबाग येथील स्ट्राँगरुमला भेट देवून तेथील सीसीटीव्ही कॅमेरे, पोलीस बंदोबस्त,सुरक्षा उपकरणे इत्यादी कार्यान्वित असल्याबाबतचा आढावा घेतला.

यावेळी निवडणूक निर्णय




अधिकारी तथा तहसिलदार अलिबाग विक्रम पाटील, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सागर सांळुखे, अजित टोळकर उपस्थित होते.

# माथेरान प्रवेशद्वारावरील नवीन लोगोवर पर्यटक खुश

**कर्जत : प्रतिनिधी**

जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ असलेल्या माथेरानच्या प्रवेशद्वारावर 'आय लव्ह माथेरान' हा नवीन लोगो लावण्यात आला आहे. येथे येणारे पर्यटक या लोगोवर इतके खुश आहेत की, तेथे आल्यावर अनेकांना या लोगो बरोबर सेल्फी काढण्याचा मोह आवरत नाही.




माथेरान मध्ये येणारे बहुतांश पर्यटक नेरळ - माथेरान घाट रस्त्याने येतात. हे पर्यटक स्वच्छता कर भरून लोखंडी जाळी असलेल्या प्रवेशद्वारातून प्रवेश करून माथेरान शहरात प्रवेश करतात. त्या ठिकाणी माथेरान नगरपरिषदेने 'आय लव्ह माथेरान' असा सेल्फी पॉईंट तयार करण्यात आला आहे. तेथे फोटो काढण्यासाठी पर्यटकांची गर्दी होत आहे.

येथे येण्यासाठी एकच मार्ग असल्याने पर्यटक त्याच मार्गाने माथेरानमध्ये प्रवेश करतात. स्वतःच्या वाहनाने किंवा टॅक्सीने पर्यटक आले की, आपली वाहने पार्क करून दस्तुरी नाक्यावर येतात

तेथे प्रवासी कर संकलन केंद्रावर येऊन कर भरून माथेरान मध्ये येतात. तेथे उभारण्यात आलेल्या सेल्फी पॉईंटचा मोह अनेकांना आवरता येत नाही.

# द्रुतगती मार्गावर अपघातांची मालिका सुरूच; ट्रामा सेंटरची गरज

**मोहोपाडा: प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर रसायनी-खालापूर हद्दीत मागील दहा वर्षांत अपघातांनी हजारांचा टप्पा ओलांडला आहे. येथील अपघाताचे वाढते प्रमाण हे चिंताजनक असून, खालापूर येथे ट्रामा केअर सेंटर अत्यंत गरजेचे झाले आहे, त्यामुळे अपघातानंतर तातडीची मदत मिळण्यास मदत होईल, असे स्थानिकांचे मत आहे.

ब्रिटिशकाळात बांधण्यात आलेला जुना मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग-४ वरील अपघात कमी व्हावेत आणि जलद प्रवास करता यावा, यासाठी द्रुतगती मार्ग बांधण्यात आला. अवघड आणि कायम वाहतूककोंडी असलेला बोरघाटाचा प्रश्न सहापदरी द्रुतगती मार्गाने संपला; परंतु वेगमर्यादा ८० असतानाही अधिकचा वेग आणि लेनच्या शिस्तीचे पालन न केल्यामुळे अपघात होत आहेत. खालापूर हद्दीतील आकडेवारी चिंताजनक आहे.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर रसायनी-खालापूर हद्दीत अपघाताचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे या परिसरात जखमींवर तातडीने उपचार होण्यासाठी सुसज्ज रुग्णालय असावे, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

अपघातग्रस्तांच्या मदतीला टिम,आयआरबीची डेल्टा फोर्स, देवदूत पथक, वाहतूक पोलीस तसेच अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्था मदतीसाठी धावून जाते. गंभीर जखमींना पुणे तसेच नवी मुंबई येथे उपचारासाठी हलविण्यात येते. खालापूर परिसरात २० किलोमीटर अंतरात गंभीर जखमींवर आवश्यक उपचार होतील, असे रुग्णालय नसल्याने लांबचा पल्ला गाठावा लागतो. रसायनी-खालापूर ट्रामा केअर सेंटर आणि कंटेनर यार्डचा प्रश्न गेल्या पंधरा वर्षांपासून प्रलंबित आहे.

द्रुतगती मार्गावर उर्से नजीक ट्रामा केअर सेंटर सुरु करण्यात आले; परंतु खालापूर हद्दीतील अपघाताची संख्या पाहता खालापूर अथवा रसायनीत सुसज्ज ट्रामा केअर सेंटर उभे राहणे गरजेचे आहे. जेणेकरून अपघात घडल्यास त्वरीत उपचार सुरू होतील आणि अपघात झालेल्यांचा जीवही वाचवता येईल.याशिवाय मुंबई-पुणे महामार्गावरील खालापूर हद्दीतील अपघातग्रस्तांकडून ट्रामा केअर सेंटरची मागणी होत आहे.





**भारतीय जनता पार्टीचे रायगडचे नेते, ज्येष्ठ समाजसेवक, नामवंत उद्योजक, दानशूर व्यक्तीमत्व प्रकाशभाऊ देसाई यांचा वाढदिवस पालीत विविध सामाजिक,सांस्कृतिक व लोकोपयोगी विधायक उपक्रमांनी धूमधडाक्यात साजरा करण्यात आला. प्रकाशभाऊ देसाई यांना शुभेच्छा देताना विविध सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व वारकरी सांप्रदायातील मान्यवर.**

# महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदेची ५० वर्षे पूर्ण; स्त्री हक्कांच्या नव्या पर्वाची सुरुवात

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदेला ५० वर्ष पूर्ण झाल्याने मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सेंटरमध्ये येत्या २०,२१ आणि २२ डिसेंबरला तीन दिवसीय राज्यव्यापी परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेत गेल्या ५० वर्षांतील स्त्री चळवळीचा आढावा आणि पुढील ५० वर्षांच्या कामाची दिशाही ठरविण्यात येणार आहे. महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदेसह ६५ हून अधिक संघटना मिळून अनेक वर्षांपासून महिलांचे स्वतंत्र आणि हक्कांसाठी कार्यरत आहेत.

महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषद ही राज्यातील एक महत्त्वाची सामाजिक चळवळ असून ती स्त्रियांचे हक्क, स्वावलंबन, समानता आणि न्याय यासाठी कार्यरत आहे. समाजातील स्त्रियांवरील वाढते हिंसाचार रोखण्यासाठी तसेच चर्चा घडवण्यासाठी महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदेच्या वतीने राज्यव्यापी परिषद आयोजित करण्यात आली आहे.

ही परिषद केवळ ५० वर्ष पूर्ण झाली म्हणून उत्सव नाही तर सध्याच्या राजकारणाचे आणि अर्थकारणाचे भान जागरूक करणे आणि त्यासाठी लढण्यास तरुण पिढीला तयार करणे हा उद्देश आहे. आमचा आक्षेप आजच्या वातावरणाला आहे तो आक्रमकता आणि हिंसा याला प्रोत्साहन देत आहे. स्त्रियांची प्रगती ही तेव्हाच होऊ शकते जेव्हा समाजातील लोकांच्या विचारांमध्ये बदल होईल. महिलांचे प्रश्न समाजासमोर मांडत त्या प्रश्नांची उत्तर सोडविण्याचा प्रयत्न. निराधार, गरजू महिलांपर्यंत पोहचण्यासाठी अनेक, उपक्रम राबविले जाणार आहेत.



## पान १ वरुन

# शेकापचे माजी आमदार बाळाराम पाटील अध्यक्ष असलेल्या संस्थेची शाळा बेकायदा

या अनुषंगाने विचुंबे येथील आशाप्रभा न्यू इंग्लिश स्कूल ही शाळा अनधिकृतरित्या चालविली जात असल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकरणी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ अंतर्गत फौजदारी कारवाई सुरू करण्यात आली असल्याची माहिती पंचायत समितीचे पनवेल गट शिक्षणाधिकारी शाहू बाबुराव सतपाल यांनी दिली.

शासनाच्या निर्देशानुसार रायगड जिल्ह्यातील सर्व गट शिक्षणाधिकाऱ्यांना विनापरवाना चालविल्या जाणाऱ्या शाळांवर कायदेशीर कारवाई करण्याबाबत प्राधिकृत करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने पनवेल तालुक्यातील विविध गावांतील एकूण १३ संशयित अनधिकृत शाळांची तपासणी सुरू आहे. या कारवाईदरम्यान आशाप्रभा न्यू इंग्लिश स्कूल, विचुंबे ही शाळा कोणतीही शासन मान्यता, नाहरकत प्रमाणपत्र नसताना चालविली जात असल्याचे आढळून आले. या शाळेला स्वतंत्र UDISE कोड नसून, इतर शाळेचा UDISE कोड बेकायदेशीररित्या वापरला जात असल्याचे तपासणीत निष्पन्न झाले आहे.

१३ नोव्हेंबर २०२५ रोजी गट शिक्षणाधिकारी व केंद्रप्रमुख यांनी शाळेस प्रत्यक्ष भेट दिली असता शाळा सुरू असल्याचे आढळून आले. या आधीच शाळा तत्काळ बंद करून विद्यार्थ्यांना नजीकच्या मान्यताप्राप्त शाळेत प्रवेश देण्याबाबत नोटीस देण्यात आली होती, मात्र सदर नोटीसचे पालन करण्यात आलेले नाही. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ च्या कलम १८ नुसार कोणतीही शाळा शासन अथवा स्थानिक प्राधिकरणाच्या मान्यतेशिवाय सुरू करता येत नाही. तसेच अधिनियमाच्या कलम १८(५) नुसार अशा उल्लंघनाबाबत फौजदारी शिक्षा व दंडाची तरतूद आहे.

या शाळेमध्ये विद्यार्थ्यांना अनधिकृतरित्या प्रवेश देणे, त्यांच्याकडून शैक्षणिक फी आकारणे तसेच शासनाची व पालकांची फसवणूक केल्याचे प्राथमिक तपासणीत समोर आले आहे. या प्रकरणी सदर शाळेचे अध्यक्ष, स्थानिक स्कूल कमिटीचे पदाधिकारी तसेच मुख्याध्यापिका यांच्याविरुद्ध खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

सन २०१४ पासून आजपावेतो बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ च्या कलम १८ नुसार कोणतीही शाळा संबंधित शासन अथवा स्थानिक प्राधिकरणाची मान्यता, ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त केल्याशिवाय सुरू करता येत नाही, अशी स्पष्ट तरतूद असतानादेखील आशाप्रभा न्यू इंग्लिश स्कूल, विचुंबे, ता. पनवेल, जि. रायगड ही शाळा अनधिकृतरित्या स्थापन करून चालविण्यात येत होती.

या शाळेमध्ये विद्यार्थ्यांना अनधिकृतपणे प्रवेश देण्यात आला असून, त्यांच्याकडून शैक्षणिक फी आकारण्यात आली आहे. तसेच शासनास देय असलेला कोणताही कर न भरता, बेकायदेशीर पद्धतीने इतर शाळेचा UDISE कोड वापरून शासनाची, विद्यार्थ्यांची व त्यांच्या पालकांची फसवणूक करण्यात आलेली आहे.

यामुळे शेकापचे माजी आमदार बाळाराम पाटील यांच्यावरही अनधिकृत शाळा चालवण्याचा ठपका आहे आणि तीच री त्यांचे समर्थक पुरुषोत्तम भोईर याने ओढत विद्यार्थी आणि पालकांचे अतोनात नुकसान व हाल केले आहेत. आता या प्रकरणी पोलीस आणि प्रशासन किती वेगाने कारवाई

# मोतीलाल झुंजुनवाला महाविद्यालयात आविष्कार संशोधन कार्यशाळा



**नवी मुंबई : बातमीदार**

विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची वृत्ती दृढ व्हावी तसेच मुंबई विद्यापीठाच्या अविष्कार रिसर्च कन्व्हेन्शनमध्ये अधिकाधिक सहभाग वाढावा या उद्देशाने वाशीतील आईसीएलईएस मोतीलाल झुंजुनवाला महाविद्यालयात भव्य संशोधन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या २४ प्रकल्पांपैकी ३ प्रकल्पांनी झोन-४ मध्ये पात्रता मिळवून मुंबई विद्यापीठाच्या पुढील पातळीवर प्रवेश मिळवला आहे.

कार्यशाळेची रचना शिक्षक व विद्यार्थी या दोन घटकांवर केंद्रित ठेवून करण्यात आली होती. मुख्य सत्रात प्राचार्या डॉ.गोस्वामी-गिरी यांनी संशोधनातील नावीन्य, स्वतंत्र विचारसरणी, शैक्षणिक काटेकोरता आणि समाजाभिमुख दृष्टिकोन यांवर परिणामकारक मांडणी केली. निरीक्षण, विश्लेषण, प्रयोग, संकल्पनात्मक रचना आणि प्रभावी सादरीकरण ही संशोधनाची मूलतत्त्वे विद्यार्थ्यांनी आत्मसात करण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी डॉ. हेमा डावरे यांनी अविष्कार संमेलनातील नियमावली, मूल्यांकन निकष, तसेच विविध श्रेणींबाबत सुस्पष्ट माहिती दिली.

या कार्यशाळेत कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखांमधून एकूण ८३ विद्यार्थ्यांनी २४ संशोधन प्रकल्प सादर केले. सामाजिक भान, पर्यावरण संवर्धन, विज्ञान-तंत्रज्ञान, एआय आधारित मॉडेल्स, जैवविविधता, तसेच प्रयोगाधारित अभ्यास अशा विविध विषयांवरील प्रकल्पांनी विशेष लक्ष वेधले. संपूर्ण कार्यशाळेचे आयोजन व समन्वय महाविद्यालयीन समन्वयक सरोज माहुलकर यांनी पार पाडले.

## दुखवटा

### भगवान बडेकर



**मोहोपाडा:** वाशिवली येथील भगवान गोविंद बडेकर यांचे अल्पशा आजाराने निधन झाले असून मृत्युसमयी ते ६६ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात एक भाऊ, पत्नी, दोन मुले,तीन मुली असा परिवार आहे. त्यांचा दशक्रियाविधी रविवार दि. २२ रोजी श्री क्षेत्र हरिहरेश्वर येथे करण्याचे योजिले आहे. मंगळवार २३ रोजी हभप दिलीप महाराज राणे यांचे सुश्राव्य किर्तन होणार आहे.तर उत्तरकार्य बुधवार २४ रोजी वाशिवली येथील राहत्या घरी होणार आहे.

# पनवेल मनपा निवडणूक; जय्यत तयारी

## ▌मतदान टक्केवारी वाढविण्यासाठी प्रयत्न –मंगेश चितळे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानूसार महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२५ चा कार्यक्रम अधिसूचनेद्वारे आज जाहिर करण्यात आला आहे. या कार्यक्रमानूसार १५ जानेवारी रोजी मतदान होणार आहे. या अनुषंगाने निवडणूक प्रक्रिया सुरळीत व पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, निवडणुकीचा प्रत्येक टप्पा अचूकपणे पार पाडण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ आणि तांत्रिक सुविधांचे चोखपणे नियोजन केले आहे.

शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासोबतच आदर्श आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी व्हावी, यासाठी पोलीस प्रशासन आणि महापालिका यंत्रणेमध्ये समन्वय ठेवण्यात आला आहे. तसेच निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या नियुक्तीपासून ते भरारी पथकांच्या तैनातीपर्यंतची सर्व तयारी पूर्ण झाली असून, लोकशाहीचा हा उत्सव यशस्वी करण्यासाठी पनवेल महानगरपालिका प्रशासन पूर्ण क्षमतेने सज्ज तयार आहे, अशी माहिती आयुक्त तथा निवडणूक अधिकारी मंगेश चितळे यांनी गुरुवारी दिली.

राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेनुसार पनवेल महापालिकेची अंतिम प्रभाग रचना ६ ऑक्टोबर २०२५ रोजी अधिसूचनेद्वारे प्रसिद्ध करण्यात आली होती. शहरात एकूण २० प्रभाग असून प्रत्येक प्रभागात ३ सदस्य याप्रमाणे एकूण ७८ सदस्य संख्या निश्चित करण्यात आली असून त्यापैकी ५० टक्के जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

निवडणूक कामकाजासाठी प्रशासनाने ६ क्षेत्रीय कार्यालयांच्या माध्यमातून भक्कम यंत्रणा उभी केली आहे. एकूण ६ निवडणूक निर्णय अधिकारी आणि १२ सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. महापालिका क्षेत्रासाठी आचारसंहिता पथक प्रमुख आणि उमेदवारांचे हिशोब तपासणी पथक प्रमुख यांचीही स्वतंत्रपणे नेमणूक करण्यात आली आहे.

शहराच्या विविध नाक्यांवर शस्त्रास्त्रे व अवैध वस्तूंच्या वाहतुकीला प्रतिबंध करण्यासाठी चेक पोस्ट पथके कार्यरत राहतील. आचारसंहिता भंगाची कोणतीही तक्रार आल्यास त्यावर तातडीने कार्यवाही करण्यासाठी महापालिका व प्रभाग स्तरावर तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

**नागरिकांनीही सक्रिय सहभाग घ्यावा**

पनवेल महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका मुक्त, निष्पक्ष व शांततेत पार पडाव्यात, यासाठी प्रशासन सज्ज असून नागरिकांनीही निवडणूक प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# तृतीयपंथींना पिटाळल्याने पोलिसांच्या वाहनावर दगडफेक

**पनवेल : वार्ताहर**

शीव-पनवेल महामार्गावरील प्रवास रात्रीच्या वेळी खरोखर सुरक्षित आहे का, असा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. खारघर परिसरात अश्लील हावभाव करून तरुणांना आकर्षित करणाऱ्या तृतीयपंथींना हुसकावून लावणाऱ्या पोलिसांच्या स्ट्रायकिंग वाहनावर दगडफेक झाल्याची गंभीर घटना घडली. सुदैवाने यामध्ये कोणताही पोलीस कर्मचारी जखमी झाला नाही. या प्रकारामुळे सामान्य नागरिकांबरोबरच पोलिसांच्या सुरक्षेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

शीव-पनवेल महामार्गावर खारघर स्कायवॉक पुलापासून काही अंतरावर काही तृतीयपंथी व्यक्ती थांबलेल्या होत्या. याच मार्गावरून रात्रीची गस्त घालणारे पोलिसांचे स्ट्रायकिंग वाहन जात असताना कर्मचाऱ्यांनी वाहन थांबवून तेथे जमलेल्या तृतीयपंथींना पिटाळून लावले. त्यांच्यासोबत उभ्या असलेल्या काही अन्य पुरुषांनाही तेथून हटवण्यात आले. तृतीयपंथी निघून गेल्यानंतर पोलिस कर्मचारी वाहनात बसण्याच्या तयारीत असताना अचानक दुचाकीवरून आलेल्या दोघांनी पोलिसांच्या दिशेने दगड भिरकावला. हा दगड स्ट्रायकिंग वाहनाच्या बाजूच्या आरशावर आदळून आरसा फुटला. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. या प्रकरणी सहाय्यक पोलीस निरीक्षकांनी दिलेल्या तक्रारीवरून खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. गेल्या वर्षभरात तृतीयपंथींच्या संदर्भात गंभीर घटनांमध्ये वाढ झाल्याचे चित्र आहे. मागील वर्षी चाकू हल्ल्याची घटना घडली होती, तर नुकतेच कळंबोलीतील स्टील मार्केट परिसरात रस्त्यावर सुरू असलेले भांडण सोडविण्यास गेलेल्या एका व्यक्तीचा लाकडी दांडक्याने मारहाणीत मृत्यू झाला होता.

पोलिसांनी या खूनातील आरोपीला अटक केली. महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई पोलिसांनी 'ऑल आऊट' मोहीम हाती घेतली असून, गैरकृत्य करणार्यांविरोधात कठोर कारवाईचे संकेत दिले आहेत. महामार्गाच्या कडेला रात्रीच्या वेळी अंधाराचा फायदा घेत तरुणांना आकर्षित करण्याच्या प्रकारांकडे लक्ष देण्याची मागणी होत आहे.

# मुलीला पळवून लैंगिक अत्याचार करणाऱ्यास अटक

**पनवेल : वार्ताहर**

खारघर परिसरातून १७ वर्षीय अल्पवयीन मुलीला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिला पळवून नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार करणाऱ्यास खारघर पोलिसांनी अटक केली आहे. अजयकुमार जनझोरड (वय २९) असे त्याचे नाव असून, पोलिसांनी त्याच्या ताब्यातून पीडित मुलीची सुटका करून तिच्या कुटुंबीयांच्या ताब्यात दिले.

अजयकुमार हा खारघरमधील पेठ गावात राहण्यास होता. गेल्या काही महिन्यापूर्वी आरोपी अजयकुमार याने पीडित मुलीसोबत प्रेमसंबंध निर्माण केले होते. त्यानंतर त्याने संधी साधून पीडित मुलीला पळवून नेत तीला कळंबोली लेबर कॅम्प मधील रूमवर नेऊन ठेवले होते. पीडित मुलीने तिची आई काम करत असलेल्या मॅडमच्या घरी जाते असे लहान बहिणीला सांगून घरातून निघून गेली होती, मात्र, सायंकाळपर्यंत घरी परतली नव्हती. त्यामुळे तिच्या घरच्यांनी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती.

तपासादरम्यान पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली असता, पीडित मुलगी एका तरुणासोबत दुचाकीवरून गेल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर खारघर पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजमध्ये दुचाकीचा नंबर मिळवून त्याच्या मालकाचा शोध घेतला असता, ही दुचाकी अजयकुमार याची असल्याचे समोर आले. त्यानंतर पोलिसांनी त्याचा शोध घेऊन खारघरमधील पेठ गावातून ताब्यात घेतले. त्यानंतर त्याची अधिक चौकशी केल्यानंतर त्याने आपला गुन्हा कबूल करत पीडित मुलीला कळंबोली येथील लेबर कॅम्पमधील घरामध्ये ठेवल्याचे सांगितले. त्यानंतर पोलिसांनी पीडित मुलीला कळंबोली येथून ताब्यात घेऊन तिला तिच्या कुटुंबीयांच्या स्वाधीन केले.

दरम्यान, पोलिसांनी पीडित मुलीची वैद्यकीय तपासणी केली असता, अजयकुमार याने तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर खारघर पोलिसांनी त्याच्या विरोधात विविध कलमांखाली गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

# राष्ट्रीय लोक अदालतीत नऊ हजार ५८८ प्रकरणे निकाली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



दाखलपूर्व आणि प्रलंबित खटल्यांचा निपटारा व्हावा आणि प्रलंबित खटले सामोपचाराने मिटावेत या हेतूने आयोजित केलेल्या १३ डिसेंबर २०२५ रोजी पनवेल येथील न्यायालयात अनेक प्रकरणे निकाली काढण्यात आली असून वादपूर्व आणि दाखल अशी एकूण ९ हजार ५८८ प्रकरणे सामंजस्याने मिटवण्यात यश आले आहे. अशी माहिती शैलेश उगले, जिल्हा न्यायाधीश १ तथा अध्यक्ष, तालुका विधी सेवा समिती, पनवेल, रायगड यांनी दिली.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय दिल्ली यांच्या निर्देशाप्रमाणे संपूर्ण भारतभर राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये न्यायालयीन प्रलंबित प्रकरणे तसेच महावितरण, बँक, फायनान्स, पतपेढी संस्था अशा विविध विभागांकडून आलेली वादपूर्व प्रकरणे ठेवण्यात आली होती. पनवेल येथील जिल्हा न्यायालयात आयोजित केल्या गेलेल्या लोक अदालतीमध्ये वादपुर्व व प्रलंबित अशी एकूण ४७ हजार ३३६ प्रकरणे ठेवण्यात आली होती. ३८ हजार ८३१ वादपूर्व प्रकरणा पैकी पाच हजार २२९ आणि ८ हजार ५२३ प्रलंबित खटल्यांपैकी चार हजार ३५९ प्रकरणे सामंजस्याने मिटवून लोक अदालतीमध्ये निकाली काढण्यात आली. व त्याद्वारे पक्षकारांना आणि विविध विभागांना एकूण ४५ कोटी ७८ लाख ८८ हजार ५३५ रुपयांची तडजोड रक्कम मिळवून देण्यात आली आहे.

पनवेल वकील संघटनेचे अध्यक्ष आणि संपूर्ण कार्यकारणी मंडळ यांचे विशेष सहकार्य मिळाले. पनवेल येथील न्यायालयात लोकअदालतीचे कक्ष स्थापन करण्यात आले होते. यासाठी कक्ष प्रमुख म्हणून दि. ए. कोठलीकर, जिल्हा न्यायाधीश – २ व अति. सत्र न्यायाधीश, पनवेल, न्यायाधीश आर. एम. गणविर, न्यायाधीश ए. एस. बडगुजर, न्यायाधीश एस. वाय. राणे, न्यायाधीश एम.डी. सैंदाणे, न्यायाधीश एम. व्ही. साळवी या न्यायाधीशांनी काम पाहिले. तसेच पंच म्हणून अ‍ॅड. इंद्रजीत भोसले, अ‍ॅड. प्रशांत गवाणे, अ‍ॅड.दिपाली बोहरा, अ‍ॅड. मनीषा गावंडे, अ‍ॅड. साहिल मोरे, अ‍ॅड. पौर्णिमा सुतार यांनी काम पाहिले.

या लोकन्यायालयाला यशस्वी करण्यासाठी सर्व न्यायिक अधिकारी, वकील वर्ग , न्यायालयीन कर्मचारी दिपाली म्हात्रे, सहा.अधीक्षक – जिल्हा न्यायालय, हेमंत आंबेतकर, वरिष्ठ लिपिक जिल्हा न्यायालय, पनवेल, न्यायालयीन कर्मचारी, आणि शैलेश कोंडसकर समवेत, समीक्षा कडू, निकिता खरात आणि विजया चव्हाण या विधी स्वयंसेवकांनी, महानगरपालिका, बँक, पोलीस प्रशासन, इतर शासकीय विभाग आणि सर्व पक्षकार यांनी प्रतिसाद दिला. शैलेश उगले, जिल्हा न्यायाधीश १ तथा अध्यक्ष, तालुका विधी सेवा समिती पनवेल रायगड यांनी सर्वांचे आभार मानले.

# बीएमएसच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली मंत्री सोनोवाल यांची भेट

**उरण : बातमीदार**

बीएमएस म्हणजेच भारतीय पोर्ट अ‍ॅण्ड डॉक मजदूर संघाच्या वतीने केंद्रीय पोर्ट व शिपिंगमंत्री सर्बानंद सोनोवाल यांची ट्रान्सपोर्ट भवन दिल्ली येथे भेट घेतली. या वेळी पोर्ट महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री सुरेश पाटील, राष्ट्रीय कोषाध्यक्ष सुधीर घरत, अध्यक्ष श्रीकांत राय व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

या चर्चेत पोर्ट कामगारांच्या वेतन करारातील राहिलेले विषयांवर चर्चा होऊन द्विपक्षीय वेतन करार समितीच्या सब कमिटीच्या रिपोर्टची लवकरात लवकर अंमलबजावणी करावी असे सांगितले. बोनस कराराची पूर्तता करावी, स्टॅगनेशन , निवृत्त कामगारांच्या पेन्शन तसेच सर्व मेजर पोर्ट मध्ये सीक्रेट बॅलेट पद्धतीने कामगार वेरिफिकेशन व्हावे ह्या विषयांवर चर्चा झाली.

सी फेरर्सच्या वतीने अक्षय बिरवाडकर व कॅप्टन इंदुलकर हे उपस्थित होते. त्याच्या देखील समस्यांबाबत चर्चा झाली. मंत्री महोदयांनी सर्व विषय समजून घेऊन संबंधित अधिकारीवर्गाला सूचना केल्या व भारतीय मजदूर संघाला सर्वोपरी सहकार्य असेल असे सांगितले.




# वाहनाची काच फोडून रोकड लंपास

**पनवेल** : शहरातील ओरियन मॉलसमोरील सेवा रस्त्याला लागून उभ्या असलेल्या वाहनाची काच फोडून रोकड लंपास केली. या प्रकरणी सुकापूर येथील हॉटेल चालकाने पनवेल शहर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.

पनवेलमध्ये हॉटेलबाहेर उभ्या केलेल्या मोटारींच्या काचा फोडून रोकड व इतर महागड्या वस्तू चोरांनी पळवल्या आहेत. कॅफेचालक तरुणाला रात्री तीन वाजता मोटारीच्या मागील दरवाजाची काच फोडून एक लाख रुपयांची रोकड आणि ओळखपत्र चोरले.

# रावसाहेब बुधे, उत्तम जरग यांची भाजप कामोठे उपाध्यक्षपदी नियुक्ती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**





माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी व कामोठे मंडल अध्यक्ष विकास घरत यांच्या माध्यमातून राजमाता अहिल्यादेवी सेवा संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब बुधे आणि निर्भय सामाजिक संस्थेचे अध्यक्ष उत्तम नाना जरग यांना भाजपचे कामोठे मंडल उपाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

दरम्यान, पांडुरंग यमगर यांची भटक्या विमुक्त आघाडीची अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. आम्ही दिलेल्या जबाबदारीचे तंतोतंत पालन करून येणाऱ्या महानगरपालिका निवडणूक मध्ये अकराच्या अकरा नगरसेवक बहुमताने निवडून आणले की जबाबदारी पूर्णपणे घेऊ, कामोठे मंडल अध्यक्ष विकास घरत यांच्या अध्यक्षतेखाली पूर्ण वेळ पणाला लावून येणाऱ्या महानगरपालिकेमध्ये ताकदीने त्यांच्यासोबत राहून भारतीय जनता पक्षाची ताकद वाढेल आणि आम्ही पूर्ण ताकतीने कामाला सुरुवात करू, असे आश्वासन रावसाहेब बुधे आणि उत्तम नाना जरग यांनी दिले आहे.

# विज्ञान प्रदर्शनात रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाचे सुयश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयास ५३व्या पनवेल तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात सुयश मिळाले आहे.

पनवेल पंचायत समिती शिक्षण विभाग, पनवेल गणित विज्ञान अध्यापक मंडळ आणि रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम स्कूल व ज्युनियर कॉलेज, कामोठे यांच्या संयुक्त विद्यमाने ५३ वे पनवेल तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन दि. १२ व १३ डिसेंबर २०२५ या दिवशी रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम स्कूल व ज्युनियर कॉलेज, कामोठे येथे संपन्न झाला.

या विज्ञान प्रदर्शनात राणी राहुल कडुसकर या सहाय्यक शिक्षिकेने 'शैक्षणिक साहित्य निर्मिती' यात ष्सोपे रंजक जीवशास्त्रष हा विषय घेऊन तृतीय क्रमांक, त्याचप्रमाणे स्वप्निल पांडूरंग पाटील याला लॅब असिस्टंट या विभागात 'शैक्षणिक साहित्य निर्मिती' यात 'नैसर्गिक घटक वापर' हा विषय घेवून तृतीय क्रमांक मिळाला आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे. या सर्वांना प्राचार्या निशा नायर यांचे मार्गदर्शन लाभले.

# पनवेलमध्ये महाराष्ट्राची सौंदर्यवती २०२५ स्पर्धा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

साहस फाउंडेशनतर्फे SS Cinevision व श्री प्रल्हाद राय झुलेलाल ट्रस्ट पनवेल यांच्या साहाय्याने आयोजित 'ब्युटी पेजंट – महाराष्ट्राची सौंदर्यवती २०२५' हा भव्य कार्यक्रम मंगळवारी (दि.१६) पनवेल येथील सिंधी पंचायत हॉलमध्ये उत्साहात झाला.

कार्यक्रमाचे उद्घाटन साहस फाउंडेशनच्या अध्यक्षा रेश्मा कुरूप, झुलेलाल ट्रस्टचे अ‍ॅड. मनोहर सचदेव, अभिनेत्री सिद्धी कामत, रेश्मा भोईर आदी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. या स्पर्धेचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे-लहान मुलं-मुली, मिसेस, मिस या गटाबरोबरच स्पेशली एबल्ड मुलांनाही या मंचावर समान संधी देण्यात आली होती.



एकूण ६५ स्पर्धकांनी स्पर्धेत सहभाग नोंदवला. प्रमुख बहुमानांचे निकाल पुढीलप्रमाणे आहेत. महाराष्ट्राची सौंदर्यवती मिसेस (५०+ गट): मानसी सुर्वे, महाराष्ट्राची सौंदर्यवती मिसेस (ओपन गट): हर्षला कारंडे, महाराष्ट्राची सौंदर्यवती मिस पूजा बंदरकर याशिवाय अनेक स्पर्धकांना फॅशन आयकॉन, फोटोजेनिक फेस आदी विविध प्रकारचे टायटल्स, क्राऊन व ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. विजेत्यांना मालाबार ज्वेलर्सतर्फे चांदीचे नाणे आणि VLCC कडून गिफ्ट व्हाउचर्स देण्यात आले. विजेत्यांना साई पलक डेव्हलपर चे प्रो भूषण पोवळे यांच्या हस्ते गौरविण्यात आले

कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून सिनेस्टार संजय खापरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर. जे. कोमल, तर कोरिओग्राफी अभिनेत्री स्वप्नाली केलजी आणि अभिनेता देवदत्त घरात यांनी केली. विजेत्यांची निवड कामोठे येथील आदी मॅटर्निटी हॉस्पिटल व स्किन क्लिनिकचे डायरेक्टर डॉ. शीतल गोसावी, अभिनेत्री अर्चना पवार आणि स्वाती सोनावणे यांनी केली. कार्यक्रमास मोहिनी विक्रांत पाटील, भूषण पोवळे, महादेव घरत, उद्योजिका रेश्मा भोईर, उद्योजिका माधवी भोईर आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली. तसेच विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांचे विशेष सहकार्य लाभले.

या नाविन्यपूर्ण व महत्त्वपूर्ण उपक्रमाबद्दल अध्यक्षा रेश्मा कुरूप व अ‍ॅड. मनोहर सचदेवा यांच्याबद्दल सर्वत्र स्तुती आणि कौतुक होत आहे. तसेच साहस फाउंडेशनचे अनघा गोळे, शीतल आंबेरकर, अनविका आणि अजिंक्य यांनी कार्यक्रमात विशेष योगदान दिले.

# कळंबोली येथे खेळ पैठणीचा कार्यक्रम

## भाजप नेते बबन बारगजे यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पार्टीचे भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे यांचा वाढदिवस कळंबोलीमधील श्री संत वामनभाऊ उद्यान सेक्टर ४ कळंबोली येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त खेळ पैठणीचा हा कार्यक्रम रंगला होता व या कार्यक्रमांमध्ये अनेक महिला भगिनींनी सहभागी होऊन खेळाचा आनंद लुटला.



सोन्याची नथ, चांदीचा शिक्का, पैठण्या, इयरफोन परफ्युम्ज अशा अनेक भेटवस्तू महिला भगिनींना देण्यात आल्या. महिला भगिनीसह लहान मुलांनीसुद्धा सहभागी होऊन आनंद लुटला. या वेळी कराओके ऑर्केस्ट्राचा सुद्धा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कराओके ज्या गाण्याचा आनंद येथील नागरिकांनी घेतला. संध्याकाळी सहा वाजल्यापासून मैदानाकडे अनेक रहिवाशांनी सहभाग घेतला.

बबन बारगजे यांना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सकाळी आशीर्वाद दिले व दुपारी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनीही त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या उद्घाटनावेळी वर्षा प्रशांत ठाकूर व चारुशीला घरत यांनी उपस्थित राहून बबन बारगजे यांना शुभेच्छा दिल्या.

संध्याकाळी कार्यक्रमाच्या वेळी पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांनी कार्यक्रमास उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या व बबन बारगजे यांच्या वाटचालीबद्दल मनोगत व्यक्त केले. त्यांच्यासोबत उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील शहराध्यक्ष अमर पाटील, जिल्हा सचिव रविनाथ पाटील, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष प्रिया मुकादम, वाहतूक संघटनेचे अध्यक्ष प्रभुदास भोईर, पनवेल ग्रामीण अध्यक्ष दशरथ म्हात्रे, माजी नगरसेवक बबन मुकादम, रवींद्र भगत, मोनिका महानवर, प्रमिला पाटील, अशोक मोटे, शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, कळंबोली शहर प्रमुख तुकाराम सरक विविध संस्थांचे पदाधिकारी, सहकारी सोसायटी यांचे पदाधिकारी व सर्व मित्र परिवार उपस्थित होते.

सर्वांनी बबन बारगजे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भाजप मंडळ उपाध्यक्ष मनीषा निकम महिला मोर्चाच्या सरचिटणीस दुर्गा सहानी चव्हाण व आदर्श युवा मित्र मंडळाचे कार्यकर्ते प्रशांत देवकर, आशिष फुटाणे, महेश बारगजे, रोहित माने, कृष्णा गर्जे सह अनेक कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण मोहोकर यांनी केले.

## संपादकीय


# कारवाईमुळे सुधारणा

गेले काही दिवस दिल्ली पाठोपाठ मुंबईच्या हवेची गुणवत्ता खालावल्याचे समोर आले होते. काही ठिकाणी हवेचा दर्जा दर्शवणारा निर्देशांक (एअर क्वालिटी इंडेक्स) २००च्या वर गेल्याचे दिसले होते. पावसाळ्यानंतर बदललेले हवामान आणि वाढलेली बांधकामे यास जबाबदार आहेत, परंतु गेल्या वर्षीच्या तुलनेत म्हणजेच १ ते १६ डिसेंबर २०२४च्या तुलनेत यंदाच्या डिसेंबरमधील याच कालावधीतील मुंबईमधील हवेच्या गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा झाल्याचे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून उपलब्ध ताज्या आकडेवारीनुसार दिसते. मुंबई महापालिका प्रशासनाने सातत्याने केलेल्या प्रयत्नांमुळेच हे शक्य झाले आहे.

**केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून अत्याधुनिक यंत्रसामग्रीद्वारे मुंबई महापालिका क्षेत्रातील हवेची गुणवत्ता नियमितपणे तपासली जाते. मंडळाच्या वेबसाइटवर आणि ‘समीर’ या अधिकृत मोबाईल ॲपवर वायु प्रदूषणविषयक आकडेवारी उपलब्ध केली जाते. समीर ॲपच्या नोंदींनुसार बुधवारी मुंबईतील बहुतांश भागांतील हवा निर्देशांक ‘मध्यम’ श्रेणीत नोंदला गेला आहे. अलीकडे शहरातील हवेचा दर्जा खालावल्याचे समोर येताच मुंबई महापालिकेकडून प्रदूषण नियंत्रणासाठी पाण्याच्या टँकरद्वारे डीप क्लिनिंग, रस्ते स्वच्छ करणे, मिस्टिंग मशीनद्वारे फवारणी यांसह योग्य उपाय न करणाऱ्या बांधकामांना कारणे दाखवा नोटीस बजावणे, काम थांबवण्याचे आदेश देणे असे उपाय सातत्याने केले जात आहेत. शहरात १ ते १६ डिसेंबरदरम्यान ३७६ ठिकाणी पाण्याच्या टँकरद्वारे रस्ते स्वच्छ करण्यासह डीप क्लिनिंग करण्यात आले. प्रदूषण नियंत्रणासाठी मुंबई महापालिकेकडून सध्या २८ मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी केली जाते आहे. या मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन व्हावे यासाठी महापालिकेकडून सर्व वॉर्ड स्तरावर ९४ भरारी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. या पथकांकडून खासगी प्रकल्पांसह रस्ते, मेट्रो आदी शासकीय प्रकल्पांचीही पाहणी करत मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन करणाऱ्यांना नोटिसा बजावल्या जात आहेत. काम थांबवण्याची नोटीस बजावल्यानंतरही मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी न केल्यास तूर्तास असलेला दहा हजार रुपयांचा दंड थेट एक लाख रुपये करण्याचे प्रस्तावित आहे. योग्य उपाययोजना न करणाऱ्या ३५३ बांधकामांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे तर १२१ बांधकामांना काम थांबवण्याचा आदेश बजावण्यात आला. बांधकाम स्थळी सेन्सर आधारित वायू गुणवत्ता निर्देशांक मोजणारी संयंत्रे कार्यान्वित राहतील याचीही पाहणी केली जाते. तापमानातील घट, धुलिकणांचे प्रमाण आणि बांधकामांमुळे निर्माण होणारी धूळ यामुळे गेल्या काही दिवसांत हवेची गुणवत्ता खालावत होती. साधारण २५ नोव्हेंबरपासून मुंबईची हवा खराब झाल्याचे जाणवत होते. शहरात धूसरपणा वाढल्याचे दिसू लागले. सकाळच्या वेळेत धुरके दिसू लागले. सप्टेंबरपासून वारे मंदावले. आर्द्रता मात्र अधिकच होती. यामुळे हवा स्थिर राहू लागली. परिणामी प्रदूषित हवा वातावरणाच्या खालच्या थरात अडकून राहू लागली. वाहनांचा धूर, औद्योगिक प्रदूषण, लाकूड व कोळशाचा इंधन म्हणून होणारा वापर आणि बांधकामांची धूळ यांमुळे मुंबईतील हवा प्रदूषित होते. सध्या या परिस्थितीत काहीशी सुधारणा दिसत असली तरी घाटकोपर, चेंबूर अशा काही भागांमधील एक्यूआय ‘वाईट’ श्रेणीतच नोंदला गेला आहे. वाढलेल्या प्रदूषणामुळे शहरी भागांत अनेकांना श्वसनाच्या समस्या जाणवतात. अशा रुग्णांमध्ये वाढ होऊ लागल्याचे डॉक्टर्सही सांगतात. खोकला, दम लागणे, ताप, शिंका, डोळ्यांना होणारा त्रास नागरिक अनुभवत असतात. वायू प्रदूषणात वाढ दिसल्यास मुंबईतही दिल्लीप्रमाणे कठोर उपाययोजना करणे भाग पडणार आहे.**

# बिबट्या केव्हा जेरबंद होणार?





**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

अलिबाग तालुक्यात सध्या बिबट्याची दहशत आहे. गेले आठवडाभर वनविभाग या बिबट्याला पाकाण्याचा प्रयत्न करतोय पण बिबट्याला जेरबंद करण्यात वनविभागाच्या यंत्रणांना अपयश आले आहे. नागावमध्ये सहा जणांवर हल्ला, नंतर आक्षी येथे दोघांवर हल्ला, आठ जणांवर बिबट्याने हल्ले केलेत. बिबट्या त्याची अधिवासात गेल्याची शक्यता वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केली. परंतु आज इकडे दिसला, सकाळी तिकडे होता, एकावर हल्ला केला अश्या चर्चा सध्या सुरू आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. बिबट्याला पकडण्यासाठी लागणारी यंत्रणा जिल्ह्यात उपलब्ध नसल्याने बिबट्याला जेरबंद करण्यात वनविभागाला अपयश आले आहे.

८ डिसेंबरला एक बिबट्या नागाव येथे शिरला. वर्दळीच्या वर्तक आळी परिसरात त्याने धुमाकूळ घातला. तब्बल सहा जणांवर हल्ला चढवत त्याने जखमी केले. यात वनविभागाचे अधिकारी आणि बचाव पथकांच्या कर्मचाऱ्यांचाही समावेश होता. बिबट्याच्या दहशतीमुळे शाळा तीन दिवस बंद ठेवण्यात आल्या. पुणे आणि रोहा येथून विशेष बचाव पथकांना पाचारण करण्यात आले. ८० वन अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी बिबट्याचा शोध सुरू केला. एका घरातील अरुंद जागेत बिबट्याला घेरून त्याला बेशुध्द करण्यासाठी डार्टही मारण्यात आला, मात्र तरीही रात्रीच्या काळोखाचा फायदा उचलत बिबट्या पसार झाला. दोन दिवस शोध घेऊन त्याचा कुठेही पत्ता लागला नाही. तिसऱ्या दिवशी हाच बिबट्या आक्षीतील साखर कोळीवाड्यात अत्यंत गजबजलेल्या वस्तीत पहाटे शिरला. आधी त्याने एका हॉटेलमध्ये शिरत एकाला जखमी केले. नंतर प्रातर्विधीसाठी गेलेल्या एकावर हल्ला चढवला.

वनविभागाने बिबट्याला जेरबंद करण्यासठी पुन्हा मोहीम हाती घेतली. गावाला लागून असलेल्या कांदळवन क्षेत्रात चार ठिकाणी पिंजरे लावण्यात आले. बिबट्याला खाद्य म्हणून बॉयलर कोंबड्या आणि मटणाचा पाहुणचार ठेवण्यात आला. पण दहशतखोर बिबट्या त्याकडे फिरकलाच नाही. कांदळवन क्षेत्रात लपलेल्या बिबट्याचा शोध घेण्यासाठी ड्रोन कॅमेऱ्यांची मदत घेतली गेली. दोन ड्रोन रात्रदिवस बिबट्याचा शोध घेत होते. ठिकठिकाणी ट्रॅप कॅमेरे बसवण्यात आले. पण बिबट्याचा सुगावा काही लागला नाही. एरवी जंगलात आणि जंगलालगत आढळणारा बिबट्या थेट गावांत शिरल्याने लोक चक्रावून गेले. सध्या नागाव , आक्षी या गावांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

रायगड जिल्ह्याच्या काही भागात, तसेच अलिबाग तालुक्यात देखील बिबट्या आल्याच्या घटना घडत आहेत. मात्र त्याने मानवी वस्तीत येऊन नागरिकांवर हल्ले केले नव्हते. मात्र नागाव मध्ये आलेल्या बिबट्याने ८ जणांवर हल्ला केला आहे. वन्य जीवांना पकडण्यासाठी आवश्यक यंत्रसामुग्री रायगड वनविभागाकडे नव्हती. मोबाइल व्हॅन, डार्ट मारण्यासाठी आवश्यक गन उपलब्ध नव्हती. बिबट्याला पकडण्यासाठी लागणारी यंत्रणा जिल्ह्यात उपलब्ध नसल्याने पुणे येथून रेस्क्यू पथकाला पाचारण करण्याची वेळ आली. रायगड जिल्ह्यात रेस्क्यू पथक असते तर बिबट्या जेरबंद करण्यात कदाचित यश आले असते.

गतवर्षी जिल्हा नियोजन समिती मार्फत आलेल्या निधीतून वाइल्ड लाइफ रेस्क्यू करण्यासाठी साहित्य घेतले आहे. सव्वाशे वनरक्षक, वनपाळ यांना रेस्क्यू साहित्य देण्यात आलेले आहे. तसेच अंजली सूट ही घेण्यात आलेले आहेत. रेस्क्यू पथक तसेच वाइल्ड ऑपरेशन साठी लागणारी यंत्रणा उपलब्ध करण्यासाठी वन विभागाने पावले उचलली आहेत. वन्य प्राण्याला बेशुद्ध करणारी डायट गन घेण्याबाबत तसेच वाइल्ड रिलेटेड साहित्य घेण्यासाठी प्रस्ताव वनविभाग शासनाला पाठवणार आहे, अशी माहिती उपवन संरक्षक अधिकारी राहुल पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली. हे प्रस्ताव शासनाने मंजूर केले तर वन्य प्राण्याचे रेस्क्यू करण्यासाठी मदत होईल. सध्या पर्यटनाचा हंगाम आहे. बिबट्याच्या भीतीमुळे नागाव , आकाशी परिसरात पर्यटक आले नाहीत तर त्याच्या परिणाम पर्यटन व्यवसायावर होईल. लोक सध्या दहशतीखाली आहेत. बिबट्या केव्हा जेरबंद होणार याची ते वाट पाहत आहेत. वन विभागाने या बिबट्याल लवकरात लवकर जेबंद करून लोकाना या भीतीच्या वातावरणातून बाहेर काढावे.

वन्य प्राणी आपल्या परिसरात आल्यानंतर त्याला पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी करू नये. आवाजामुळे वन्य प्राणी हे सैरावैरा पळू लागतात. त्यामुळे त्याला पकडण्यात अडचणी निर्माण होत असतात. वन्य प्राणी हा शकतो कोणावर हल्ला करीत नाही. तो काहीवेळाने आपल्या अधिवासात निघून जातो. अफवांवर विश्वास न ठेवता जनतेनेदेखील वन विभाग, पोलिसाना सहकार्य करायला हवे.

# एकल पालकत्व एक आव्हान...

आईपण एक खडतर प्रवास आहे. तुम्ही स्वतः ही भूमिका करीत नाही तोपर्यंत ही भूमिका कळणं अशक्य आहे.हे पालकत्व एकेरी असेल तर मग मोठं आव्हान पेलण्यासारखं आहे.एकल पालकत्वाचेसुद्धा प्रकार आहेतच.

काही कुटुंबामध्ये वडील नसतील तरी कुटुंब आर्थिकदृष्टीने सक्षम असेल तर पैसे कमविण्याचा ताण आईवर नसतो मात्र मुलांना वळण लावणं हे अत्यंत कठीण होऊन जातं का तर मुलांना वडील नाहीत त्यामुळे लाड केले जातात,मागेल ते मिळाल्याने मुलं हट्टी बनतात. ही परिस्थिती हाताळणे त्या आईला किती कठीण होत असेल याचा कुणीच विचार करत नाही...

काही कुटुंबामध्ये वडील नसले तरी आई चांगल्या ठिकाणी नोकरी करणारी असते, घरातील मंडळी मुलांना सांभाळतात. इथे सगळी गणितं वेळेनुसार मांडली जातात.आई–बाबा यांची कमी भरून काढण्यासाठी अशा आयांची किती ससेहोलोट होत असेल याची कल्पनाच केलेली बरी...

काहींची परिस्थिती हालाकीची असते.नीट निवारा नाही, आईचं शिक्षण कमी,पर्याय नसल्यानं अर्थार्जनासाठी मिळेल ते काम करण्याशिवाय गत्यंतर नसतं.मग दोन–दोन ठिकाणी छोट्या–मोठ्या नोकऱ्या करणं आणि अशात मूलांकडे दुर्लक्ष होतं.मुलांना सांभाळायलाही कुणी नसतं.अशी मुलं गुन्हेगारी मार्गाकडे वळतात,याचा परिणाम शिक्षणावर होतो...आईला हे कळत नसतं का?तर कळतं पण पर्याय नसतो.श्रीमंत असो वा गरीब प्रत्येक आईला तिच्या पिलांना जगवायचं असतं,कोणत्या आईला वाटेल आपली मुलं वाईट मार्गाला जावीत पण परिस्थितीमुळे ते घडतं.अशा वेळी या मुलांना धाक द्यायचा सोडून लोकं त्या आईचे संस्कार बाहेर काढतात,हेच शिकविलं का आईने म्हणून उद्धार करतात.काय करायचं त्या आईने...?

हल्ली तर काही शाळांमध्ये एकल पालकत्व असणाऱ्यांच्या पाल्यांना प्रवेश नाकारला जातो...

अशा मुलांकडे समाजातील असंख्य डोळे वेगवेगळ्या नजरेनं पहात असतात.अनेकवेळा पालकच सांगतात त्याला वडील नाहीत त्याच्याशी मैत्री करू नकोस.खूप लहान वयात जबाबदारी आल्याने ही मुलं व्यवहारचतुर होतात,स्वतः ची कामं स्वतः करतात त्यावेळी हेच पालक त्या मुलांना उपहासाने म्हणतात,बरोबर तुमचं कोण आहे करायला?आणि त्या मुलांना जाणीव करून देतात.अशा परिस्थितीत बिचाऱ्या आईवर किती ताण येत असेल,स्वतःची मानसिकता शाबूत ठेवायची की,मुलं भरकटू नये म्हणून प्रयत्न करायचे?त्यामुळेच एकट्या स्त्रियांच्या बाबतीत आईपण किती आव्हानात्मक आहे हे लक्षात येतं. जी खंबीर आहे ती तरते पण जी तशी नाही तिच्या मूलांचं काय होत असेल ...?

**–ऋतुजा म्हात्रे–महामुनी**



## बदलते तंत्रज्ञान

# मोबाईल सायबर हल्ले वाढताहेत; अनेक ॲप्स धोकादायक!




भारतीयांच्या मोबाईलवर सध्या जगात सर्वाधिक हल्ले होत असून याद्वारे खासगी माहिती चोरण्यासह आर्थिक गंडाही घातला जात आहे. ‘जेडस्केलर थ्रेटलॅब्ज २०२४ मोबाइल, आयओटी अँड ओटी थ्रेट’ अहवालात समोर आले आहे.

या अहवालात असे नमूद करण्यात आले आहे की, भारत हे मोबाइल मालवेअर हल्ल्यांचे सर्वात मोठे लक्ष्य बनले आहे. जून २०२३ ते मे २०२४दरम्यान जगभरातील सर्व मोबाईल मालवेअर हल्ल्यांपैकी सर्वाधिक २८ टक्के भारतात झाले. यानंतर अमेरिकेत २७.३ टक्के आणि कॅनडात १५.९ टक्के हल्ले झाले.

अहवालात बँकिंग मालवेअर हल्ल्यांमध्ये २९ टक्के आणि मोबाइल स्पायवेअर हल्ल्यांमध्ये १११ टक्के वाढ झाल्याचे समोर आले आहे. भारतीय टपाल सेवाही सायबर हल्लेखोरांचे लक्ष्य बनली. दरम्यान, एसएमएस वापरून हल्लेखोर मोबाइल युजर्सना फिशिंग साइट्सना भेट देण्यासाठी सांगतात. जे त्यांना क्रेडिट कार्ड डिटेल्स प्रविष्ट करण्यास सूचित करतात.

मालवेअर, स्पायवेअर काय?

‘मालवेअर’ हे सॉफ्टवेअर मोबाईल किंवा संगणकावर एखाद्याची ओळख चोरण्यासाठी किंवा गोपनीय माहिती चोरण्यासाठी वापरले जाते. स्पायवेअर हा मालवेअरचा एक प्रकार आहे. याद्वारे एखाद्या व्यक्तीची वैयक्तिक माहिती त्याच्या नकळत मिळवली जाते.

बँक ग्राहकांनो, सावधान!


थ्रेटलॅब्ज विश्लेषकांच्या मते, एचडीएफसी, आयसीआयसीआय आणि ॲक्सिससारख्या प्रमुख भारतीय बँकांच्या मोबाइल ग्राहकांना लक्ष्य करून फिशिंग केले जात आहे. या बँकांच्या ग्राहकांवरील हल्ले वाढले आहेत.

२००हून अधिक ॲप्स धोकादायक!

अभ्यासात गुगल प्ले स्टोअरवर २००पेक्षा अधिक असे ॲप्स आढळून आले आहेत, जे सुरक्षिततेच्या दृष्टीने धोकादायक आहेत.

दरम्यान, हल्ली मोबाईलचा वापर सर्रास वाढला आहे. लहान मुलांपासून वयोवृद्ध मंडळींपर्यंत सर्वच जण मोबाईलचा वापर वेगवेगळ्या कारणांसाठी करतात. हे लक्षात घेत काही लोक मोबाईलधारकांना लक्ष्य करून फसवणूक करीत असतात. अशांपासून सावध राहिले पाहिजे.

# हरहुन्नरी कलावंत ओमप्रकाश बक्षी



**निमित्त**

चरित्र अभिनेते ओमप्रकाश बक्षी यांचा जन्म १९ डिसेंबर १९१९ रोजी झाला २१ फेब्रुवारी १९९८ रोजी त्यांचे निधन झाले. या हरहुन्नरी कलावंताबद्दल जाणून घेऊया.

ओमप्रकाश यांना चरित्र अभिनेता म्हटले म्हणजे झाले, अशी वस्तुस्थिती नाही. हा कलावंत नायक, खलनायक, चरित्र अभिनेता, चित्रपट निर्माता, दिग्दर्शक आणि विनोदी अभिनेताही होता. त्यांच्या विनोदी भूमिकांचे प्रमाण थोडे जास्त असल्यामुळे पटकन ओमप्रकाश कोण, तर ‘विनोदी अभिनेता ना!’ असेच म्हटले जाते, पण विविध प्रकारच्या भूमिकांतून अभिनयाचे विविध पैलू दाखवणारे हे व्यक्तिमत्त्व तसे फार वेगळे होते.

लाहोर येथे सधन कुटुंबात जन्मलेल्या ओमप्रकाश बक्षी यांना लहानपणापासून चित्रपटांचेच आकर्षण होते. आपण सिनेमात जाऊन अभिनेता व्हावे, असे त्यांना वाटत होते, पण मार्ग सापडत नव्हता. वयाच्या सतराव्या वर्षी त्यांनी लाँड्री व्यवसाय सुरू केला, पण दोन वर्षांतच तो बंद करून ते लाहोरच्या रेडिओ स्टेशनवर नोकरीस गेले. तेथे होणाऱ्या नाटकांमध्ये एक कलाकार म्हणून ते बऱ्यापैकी रमले, पण काही काळातच तेही त्यांनी बंद केले, पण बहुधा त्यामधील त्यांचे काम पाहून प्रसिद्ध चित्रपट निर्माते दलसुखलाल पंचोली यांनी त्यांना बोलावून घेतले आणि आपल्या ‘दासी’ चित्रपटातील एक भूमिका त्यांना देऊ केली. १९४४मध्ये ‘दासी’ प्रदर्शित झाला आणि चांगला चाललाही! नंतर धमकी, शहर से दूर, पगडंडी, आयी बहार, असे काही चित्रपट त्यांना मिळत गेले. १९४७च्या फाळणीवेळी ते लाहोर सोडून मुंबईला आले; पण एक–दोन वर्षे मुंबईतील चित्रपट जगतात त्यांना काम मिळाले नाही.

१९४८मध्ये निर्माते जयंत देसाई यांनी त्यांना ‘लखपती’ या चित्रपटात खलनायकाचे काम दिले. ओमप्रकाश यांचे त्यापूर्वीचे एक–दोन चित्रपट देसाई यांनी पाहिले होते. त्यामुळेच हा कलावंत व त्याचे गुण त्यांनी जाणले होते. आणि जयंत देसाईंचा तो अंदाज खरा ठरला व ‘लखपती’मधून ओमप्रकाश यांना प्रसिद्धी मिळून त्यांची वाटचाल सुरू झाली. ती अखंड सुरूच राहिली.

ओमप्रकाश यांची बोलण्याची विशिष्ट ढब, आवाजातील चढ–उतार, त्यात मधूनच आणलेला हेतुपुरस्सर चिरकेपणा आणि जबरदस्त टायमिंग या उपजत वैशिष्ट्यांमुळे हा कलावंत समोर कोणताही अभिनेता असला तरी आपला प्रभाव पाडून जात असे! ओमप्रकाश नायक म्हणून शोभणारा चेहरा घेऊन आले नव्हते; पण तरीही ‘घंघरू’ या १९५२च्या चित्रपटात त्यांनी प्रौढ नायकाची भूमिका केली होती.

अभिनयाव्यतिरिक्त ओमप्रकाश यांनी ‘लाइट ॲण्ड शेड’ ही स्वतःची निर्मितीसंस्था काढून, दुनिया गोल है, चाचा झिंदाबाद, संजोग, जहाँ आरा, गेट वे ऑफ इंडिया, कन्हैया अशा काही चित्रपटांची निर्मितीही केली होती. त्यातील काही चित्रपट त्यांनी स्वतः दिग्दर्शितही केले होते. परंतु उत्कृष्ट गीते आणि वेगळी कथानके असलेले हे चित्रपट प्रचंड लोकप्रियता मिळवू शकले नव्हते, एवढेच ओमप्रकाश यांचे दुर्दैव होते. परंतु त्यांची चित्रपटसृष्टीतील एकूण कारकीर्द यशस्वी आणि देदीप्यमान ठरली. जातिवंत, उत्कृष्ट अभिनेता म्हणूनच त्यांचे नाव आदराने घेतले जाते! अशा या कलावंताला अभिवादन करु या ..**–पद्माकर पाठक**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# हिवाळ्यात ‘अशा’ पद्धतीने घ्या आरोग्याची काळजी

राज्यभरात काही प्रमाणात थंडीचा कडाका जाणवू लागला आहे. उकाडा कमी झाल्याने ही थंडी काहीशी आल्हाददायक वाटत असली तरी त्याचा त्रास होऊ नये म्हणून काळजी घेणे महत्त्वाचे आहे. त्यामध्ये शरीराचे तापमान योग्य राहावे यासाठी आहारात कोणत्या पदार्थांचा समावेश करावा. काय काळजी घ्यावी? यांसारखे प्रश्न आपल्याला नेहमीच पडतात. तेव्हा काय काळजी घ्यावी याच संदर्भात पुण्याच्या मदरहूड हॉस्पिटल आहारतज्ज्ञ सल्लागार, डीटी इंशारा महेदवी यांनी सविस्तर माहिती दिली आहे.



या ऋतूमध्ये आर्द्रता आणि तापमानातील चढ–उतारांमुळे विषाणू आणि आजार नेहमीपेक्षा वेगाने पसरणे सोपे होते. या काळात लहान मुले आणि प्रौढांना अनेकदा खोकला, ताप, फ्लू आणि संसर्ग यांसारख्या हंगामी आजारांचा सामना करावा लागतो. त्यामुळे अस्वस्थता निर्माण होऊ शकते, असे आहारतज्ज्ञ इंशारा महेदवी यांनी सांगितले.

दिल्लीच्या सी. के. बिर्ला हॉस्पिटलचे संचालक पल्मोनोलॉजिस्ट डॉ. विकास मित्तल म्हणाले, फ्लू हा इन्फ्लूएंझा विषाणूमुळे होतो, जो लहान मुले, प्रौढ आणि वृद्धांसह सर्व वयोगटांतील लोकांना प्रभावित करतो. फ्लूची लक्षणे सहसा सामान्य सर्दीसारखी दिसतात; परंतु रोगप्रतिकार शक्ती कमी असलेल्या व्यक्तींमध्ये हा आजार गंभीर रूप धारण करू शकतो. पाच वर्षांखालील मुले आणि ६० वर्षांवरील प्रौढांना फ्लूमुळे न्यूमोनियासारखी गुंतागुंत होऊ शकते, जी जीवघेणी ठरू शकते.

**फ्लूपासून असे रहा सुरक्षित**

* शारीरिक अंतर राखणे : गर्दीच्या ठिकाणी इतरांपासून किमान सहा फूट अंतर ठेवा.
* हाताच्या स्वच्छतेचा चांगला सराव करा : आपले हात नियमितपणे धुवा; विशेषत: चेहरा, नाक किंवा तोंडाला स्पर्श करण्यापूर्वी.
* तोंड आणि नाक झाकून घ्या : खोकताना किंवा शिंकताना टिश्यू किंवा रुमालाचा वापर करा.
* मास्क वापरा : एखाद्या व्यक्तीला सर्दी किंवा फ्लूची लक्षणे असल्यास, मास्क घातल्याने विषाणूचा प्रसार रोखता येतो.

याशिवाय प्रतिकारशक्ती मजबूत करणेही महत्त्वाचे आहे, असे डॉ. मित्तल यांनी सांगितले. दैनंदिन पौष्टिक आहार घेतल्यास रोगप्रतिकार शक्ती मजबूत होण्यास होऊ शकतेग्यविषयक गुंतागुंतीविरुद्ध लढण्यासाठी एक ढाल म्हणून काम करू शकते. दैनंदिन आहारात विशेषतः रोगप्रतिकार शक्ती वाढवणारे पोषक पदार्थ समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

# महाबळेश्वरकडे जाणारी सहलीची बस आंबेनळी घाटात कलंडली






**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर ते महाबळेश्वर रस्त्याच्या रूंदीकरणाच्या कामामुळे रस्त्याची दूर्दशा झाली असून प्रतापगड दर्शनानंतर महाबळेश्वरकडे जाणारी सहलीची बस आंबेनळी घाटात रस्त्यालगतच्या चरामध्ये कलंडल्याची घटना झाली. या अपघातात दरीच्या बाजूऐवजी रस्त्यालगत डोंगराच्या बाजूच्या चरामध्ये सहलीची बस कलंडल्याने मोठा जीवघेणा अपघात टळला आहे.

समर्थ ट्रॅव्हल्सची खासगी रामेश्वर आरामबस (एमएच ४७ वाय ७९९२) ही सहलीच्या विद्यार्थ्यांना घेऊन प्रतापगड दर्शनानंतर महाबळेश्वरकडे निघाली असताना आंबेनळी घाटात या आरामबसचा टायर रस्त्यालगत खोदण्यात आलेल्या चरात अडकल्याने बसचा पुढील टायर अधांतरी राहिला. या प्रकारामुळे आरामबसमधील विद्यार्थी व शिक्षक तसेच बसचे कर्मचारी यांच्या किंचाळयांनी परीसरामध्ये भितीदायक वातावरण निर्माण झाले. सुदैवाने या अपघातात विद्यार्थी, शिक्षक व चालक यांना कोणतीही दुखापत झाली नाही. मात्र या अपघातामुळे आंबेनळी घाटामध्ये काही काळ वाहतुकीचा खोळंबा झाला आणि ही अपघातग्रस्त आरामबस काही वेळानंतर क्रेनच्या सहाय्याने बस चरातून बाहेर काढेपर्यंत अनेक वाहनचालकांना या ट्रॅफिक जॅममध्ये अडकून मनस्ताप झाला.

अपघाताच्या ठिकाणी आंबेनळी घाटातील तीव्र वळणाचा योग्य अंदाज न आल्याने बस रस्त्याच्या कडेला घसरत ठेकेदारांनी रस्त्यावरील पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी खणलेल्या चरांमध्ये अडकली. आरामबसचा टायर चरामध्ये अडकल्याचे समजताच स्थानिक नागरिक, अडकलेले वाहनचालक आणि दुचाकीस्वारांनी तात्काळ मदतकार्य करत विद्यार्थ्यांना बसमधून बाहेर काढले.

आंबेनळी घाटातील रस्ता अरुंद असून तीव्र वळणांमुळे अपघातानंतर दोन्ही बाजूंनी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. आंबेनळी घाटाच्या रूंदीकरणामुळे रस्त्याची परिस्थिती संबंधित ठेकेदारांकडून अधिकच बिकट करून ठेवण्यात आल्याने भविष्यात मोठया अपघाताची शक्यता दिसून येत आहे.

# तेलवडे ते खारआंबोली मुख्य रस्त्यावरील पथदिव्यांचे लोकार्पण





**मुरूड : प्रतिनिधी**

नऊगाव आगरी समाज संघटनेच्या मागणीनुसार तेलवडे ते खारआंबोली मुख्य रस्त्यावरील उभारलेल्या नविन एल ई डी पथदिव्यांचे लोकार्पण मुरूड रोहा अलिबाग मतदार संघाचे आमदार महेंद्रशेठ दळवी यांच्या शुभ हस्ते श्रीफळ वाढवून,लाईट स्वीच ऑन व फलकाचे अनावरण करुन उद्घाटन करण्यात आले.

यावेळी शिवसेना जिल्हा युवा नेते विघ्नेश माळी, उपजिल्हा प्रमुख –भरत बेलोसे, तालुका प्रमुख –निलेश घाटवल, उपतालुकाप्रमुख –मनोज कमाने, महिला जिल्हा प्रमुख –तृप्ती पाटील,युगा ठाकुर,युवा उपजिल्हा प्रमुख दिपेश वरणकर, शिवसेना बांधकाम संघटनेचे अध्यक्ष –दिनेश मिनमिने, तालुका संघटक यशवंत पाटील,राजपुरी जिल्हा परिषद संपर्क प्रमुख–जिविता मिनमिने,अनिल कमाने, शंकर कांबळे, कृष्णा माळी, गणपत गोसावी, गणेश म्हात्रे,मोहन वारगे, गणेश म्हात्रे,संकेत आरकशी,संदिप कमाने, चिंतामणी बेडेकर,प्रमोद तांबडकर प्रविण बैकर, किशोर धामणस्कर आदिंसह मान्यवर उपस्थित होते.

आमदार महेंद्रशेठ दळवी यांनी आपल्या मनोगतात व्यक्त करताना म्हणाले की या नवीन पथदिव्यांमुळे परिसराला सौंदर्य प्राप्त झाले आहे.या परिसरातुन रात्रीचा प्रवास अधिक सुरक्षित होईल.अंधाराच्या समस्या दुर होऊन ग्रामस्थांन मध्ये सकारात्मक वातावरण निर्माण होईल.हा विजेचा खांब नसुन सुरक्षिततेचा आणि विकासाचा आधारस्तंभ आहे.ग्रामस्थांच्या जीवनात उजेड आणण्यासाठी आम्ही सैदव तत्पर आहोत जनसेवेचा संकल्प दुढ आहे. नऊ गाव आगरी समाजांनी जी मागणी केली ती पुर्णत्वास नेली आसुन लवकरच या परिसरात रस्त्यालगत जागा विकत घेऊन भव्य असा आगरी समाज मंदिर बांधुन देऊ असं वचन यावेळी आमदार महेंद्रशेठ दळवी दिले.आगरी समाजांनी मला निवडणूकीत भरपूर मतदान केले तसेच येणाऱ्या जिल्हा परिषद –पंचायत समिती व ग्रामपंचायत निवडणुकीत आमचया शिवसेनेचया शिलेदारांना आशिर्वाद देऊन भरघोस मतदान करावे असे आवाहन आमदार महेंद्रशेठ दळवी यांनी केले.

नऊगाव आगरी समाज संघटनेच्या मागणीनुसार तेलवडे ते आंबोली मुख्य रस्त्यावरील पथदिव्यांकरिता ८० लाख इतका निधी मंजूर करुन काम पुर्णात्वास नेल्याबद्दल आमदार महेंद्रशेठ दळवी यांचे तसेच काम पुर्णत्वास नेण्याकरिता सातत्याने प्रयत्नशील राहिल्याबद्दल शिवसेना जिल्हा युवा नेते –विघ्नेश माळी यांचे समस्त नऊगाव आगरी समाजाच्या वतीने त्यांचा सत्कार करुन आभार व्यक्त केले.

# मंत्री गोगावले यांच्या हस्ते महादेव मंदिर जिर्णोध्दार व अंतर्गत रस्त्यांचे भूमिपूजन

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील मोरगिरी गावठाण येथे शिवसेनेतर्फे भव्य पक्षप्रवेश व विकासकामांचा भूमिपूजन सोहळा उत्साहात झाला असता महाराष्ट्र रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेच्या विकासात्मक कार्याने प्रेरित होऊन अनेक ग्रामस्थांनी शेकाप पक्षाचा लाल बावटा ठेऊन शिवसेनेचा भगवा झेंडा हातात धरला. याप्रसंगी मंत्री भरत गोगावले यांच्याहस्ते महादेव मंदिर जिर्णोध्दार व अंतर्गत रस्त्यांचे भूमीपूजन करण्यात आले.

मंत्री भरत गोगावले यांचे हस्ते पक्षप्रवेश घेण्यात आले. यामध्ये प्रमुख कार्यकर्ते सहदेव जाधव, दत्ताराम बामणे, काशीराम रांगडे, भागोजी पदरथ, सखाराम पदरथ, तुकाराम पवार, सखाराम पवार, महादेव जाधव, दगडू जाधव, चंद्रकांत पदरथ, हरिश्चंद्र पवार, पांडुरंग पवार, विठ्ठल पवार, बंटी पवार, प्रशांत पवार, मनोहर पवार, गोपाळ पवार, कैलास पवार, सुशांत पदरथ, विनोद पदरथ यांच्यासह मुंबई–पुणे–बडोदा येथील अनेक कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. सर्व प्रवेशकर्त्यांचे स्वागत केले व शिवसेनेत सर्वांना सन्मानाची वागणूक दिली जाईल, असा विश्वास व्यक्त केला.

कार्यक्रमास जिल्हा सहसंपर्कप्रमुख व माजी जि.प.सदस्य चंद्रकांत कळंबे, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, ज्येष्ठ शिवसैनिक दशरथ उतेकर, उपतालुकाप्रमुख सतीश शिंदे, सुरेंद्र बांदल, शहरप्रमुख सुरेश पवार, विभागप्रमुख लक्ष्मण मोरे, युवासेना संपर्कप्रमुख विजय शेलार, माजी उपसभापती शैलेश सलागरे, नरेश सलागरे, दत्ताराम मोरे, स्वप्निल चोरगे, श्रीराम गायकवाड, अविनाश शिंदे, सरपंच विकास नलावडे, चंद्रकांत सणस, जगदीश महाडिक, सुयोग शिंदे, जनार्दन कदम, नितीन दळवी, प्रकाश शिंदे, संदीप शिंदे, प्रसाद मोरे, तानाजी निकम, अनिल दळवी, अनिल भिलारे, रामदास कळंबे, प्रकाश कदम, निलेश कुंभार, निलेश कंक, विजय मोरे, गीता दळवी, रामचंद्र ढवळे आदी पदाधिकारी उपस्थित राहिले.

यावेळी सर्व प्रवेशकर्त्यांनी यापुढे संपूर्ण मोरगिरी गावठाण शिवसेनेच्या बाजूने एकनिष्ठ राहील व येणाऱ्या निवडणुकांमध्ये शिवसेनेचा सिंहाचा वाटा असेल, असे एकमुखाने जाहीर केले.

मंत्री गोगावले यांनी, मोरगिरी गावाच्या सर्वांगीण विकासासाठी शिवसेना कटिबध्द आहे. तालुक्याच्या विकासासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील असून जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये शिवसेनेचा भगवा झेंडा नक्कीच फडकणार,असा विश्वास व्यक्त केला.


**PUBLIC NOTICE**

**IN THE HON'BLE COURT OF CIVIL JUDGE SENIOR DIVISION, BELAPUR**

**MISC. APPLICATION NO. 719 OF 2025**

**1. KANCHANMALA BHIMRAO GHODKE**
AGE: 67 YEARS, OCC: RETIRED

**2. ROHIT BHIMRAO GHODKE**
AGE: 42 YEARS, OCC-SERVICE

**3. HARSHAD BHIMRAO GHODKE**
AGE: 40 YEARS, OCC-SERVICE ...APPLICANTS

VERSUS

**NIL** ...OPPONENT

WHEREAS the above-named applicants have filed the Miscellaneous Application for **SUCCESSION CERTIFICATE (LETTER OF ADMINISTRATION)** under Indian Succession Act, 1925, as per matter of will of Bhimrao Yellapa Ghodke in the Court of Civil Judge (S.D.) Belapur, in respect of the property mentioned hereinunder in the schedule standing in the name of **LATE MR. BHIMRAO YELLAPA GHODKE** who expired on 09th December 2024.

AND WHEREAS if any person has objection, title, claim, share, etc. in the property herein-under mentioned then they may appear in person or through their advocate, objecting this application. If no one appears and objects, for the same within 30 days from the date of this notice then this Hon'ble Court will proceed to pass the necessary orders thereon.

**SCHEDULE OF PROPERTIES**

1. 100% ownership of Plot No. 33, R.S. NO. 78/1A+1B+IC, SHREYA HERITAGE, Anand Nagar, Hubli, Taluka Kacheri, Dist. Dharwad, Karnataka 580024. (Property Was Sold with Registered Sale Deed on 08/03/2022 i.e. "EXH. F")

2. 25% ownership of (1/4th Agricultural Land which approximately is about 1.9 Acres) Agricultural Land bearing R.S. No. 123/3 measuring 4 Acres 24 Gunthas, R.S. No. 123/2 measuring 2 Acres 32 Gunthas situated at Village Tadas, Dhundashi Hubli, Taluka Shiggaon, Dist. Haveri, Karnataka -581212.

3. 50% Share in Right, Title and interest of all that flat premises bearing Flat no. 901, 9th Floor, having Carpet area of 29.097 sq. mtrs., of the said building known as "BHAKTI HEIGHTS CO-OPERATIVE HOUSING SOCIETY", constructed on Plot No. A-2 in Sector No. 19-B. at Ulwe, Navi Mumbai. Tal. Panvel, Dist. Raigad within the limits of CIDCO Ltd./Panvel Municipal Corporation - 410206.

Given under my hand and seal of this Court on this Court on this 11th day of NOVEMBER 2025

Court Seal

**Sd/-**
**Asst. Superintendent**
**Jr. Clerk**
**Civil Court (S. D.) Belapur**


# मध्य रेल्वेच्या तत्काल तिकीट बुकिंगसाठी ओटीपी–आधारित प्रणाली

**रोहे : प्रतिनिधी**

भारतीय रेल्वे तत्काळ तिकीट बुकिंगसाठी नवीन ओटीपी–आधारित प्रमाणीकरण प्रणाली टप्प्याटप्प्याने अंमलात आणत आहे.मध्य रेल्वेवरील आणखी पाच गाड्यांमध्ये १९ डिसेंबर पासून तत्काळ तिकीट बुकिंगसाठी ही नवीन ओटीपी–आधारित प्रमाणीकरण प्रणाली लागू करण्यात येणार आहे.

ही सुविधा १९ डिसेंबर पासून लागु करण्यात आलेल्या गाड्यांमध्ये ११०२९ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस – कोल्हापूर कोयना एक्सप्रेस, ११०५५ लोकमान्य टिळक टर्मिनस – गोंडा गोदान एक्सप्रेस, ११०६१ लोकमान्य टिळक टर्मिनस – जयनगर एक्सप्रेस, ११०२५ पुणे जंक्शन – अमरावती एक्सप्रेस, १२१५७ पुणे जंक्शन – सोलापूर हुतात्मा एक्सप्रेस या गाड्यांचा समावेश आहे.

ही नवीन प्रणाली संगणकीकृत पीआरएस काउंटर, अधिकृत एजंट तसेच आयआरसीटीसीच्या वेबसाइट/अॅपद्वारे बुक करण्यात येणाऱ्या तत्काळ तिकिटांसाठी लागू राहील. या प्रक्रियेनुसार, बुकिंगच्या वेळी दिलेल्या मोबाईल क्रमांकावर प्रवाशाला एकदाच वापरता येणारा संकेतांक (ओटीपी) प्राप्त होईल. ओटीपीची यशस्वी पडताळणी झाल्यानंतरच तत्काळ तिकीट जारी करण्यात येईल.

या उपाययोजनेचा उद्देश पारदर्शकता अधिक मजबूत करणे, गैरवापर रोखणे तसेच तत्काळ कोट्यातील बुकिंगचा लाभ खऱ्या प्रवाशांपर्यंत पोहोचवणे हा आहे.मध्य रेल्वेकडून प्रवाशांना विनंती करण्यात येते की, तत्काळ तिकीट बुकिंगच्या वेळी कोणतीही गैरसोय टाळण्यासाठी आपला मोबाईल क्रमांक अचूकपणे नोंदवावा. असे आवाहन करण्यात आले आहे

# नागोठण्यातील रयान पॅलेस सोसायटीच्या कायदेशीर लढाईला यश

**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठणे येथील हॉटेल लेक व्ह्यू जवळील सिटी सर्व्हे क्रमांक ४६३ मध्ये बांधलेल्या इमारतीच्या संकुलाची मालकी अखेर रयान पॅलेस सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या नावावर झाली आहे. फ्लॅट खरेदीदारांनी स्थापन केलेल्या या संस्थेने, विकासक एनआर बिल्डर्स अँड डेव्हलपर्सचे मालक निसार अली चौधरी यांच्याविरुद्ध कायदेशीर लढा देत 'डीम्ड कन्व्हिनियन्स प्रक्रियेद्वारे हा ऐतिहासिक विजय मिळवला आहे.



चार वर्षांच्या कायदेशीर लढाईला यश एनआर बिल्डर्स अँड डेव्हलपर्स यांनी २०१७–२०१८ मध्ये सिटी सर्व्हे क्रमांक ४६३ मध्ये इमारतीचे बांधकाम करून फ्लॅट्सची विक्री केली होती. मात्र, कायद्यानुसार सोसायटीला जमिनीची मालकी हस्तांतरित करण्यात आली नव्हती. या विरोधात रयान पॅलेस सीएचएस लिमिटेडने गेल्या चार वर्षांपासून सातत्याने कायदेशीर संघर्ष सुरू ठेवला होता. या संस्थेने जिल्हा उपनिबंधक – अलिबाग आणि दिवाणी न्यायालयामध्ये डीम्ड कन्व्हिनियन्सद्वारे मालकी मिळवण्यासाठी अर्ज केले होते आणि अखेर सोसायटीने ही कायदेशीर लढाई जिंकली आहे.

रयान पॅलेस बिल्डिंग असलेल्या सिटी सर्व्हे क्रमांक ४६३ मधील संपूर्ण जमिनीची मालकी सोसायटीच्या नावावर हस्तांतरित करण्यात आली आहे आणि सोसायटीचे नाव रोहा तालुका भूमी अभिलेख प्रॉपर्टी कार्डमध्ये नोंदविण्यात आले आहे.

# माणगाव श्रद्धा इंग्लिश मीडियम स्कूलचे २०२५ वार्षिक क्रीडा संमेलन उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

श्रद्धा इंग्लिश मीडियम स्कूलचे वार्षिक क्रीडा संमेलन २०२५ दि.१७ डिसेंबर २०२५ रोजी खर्डी येथील मैदानावर मोठ्या उत्साहात व जल्लोषात पार पडले.

या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून माजी सैन्य अधिकारी कॅप्टन निर्मलसिंग रंधावा,शहर समन्वयक अतुल जाधव,माणगाव नगरपंचायत तसेच समाजसेवक भूषण सिसोदे आदी मान्यवरांसह स्कूलच्या संस्थापक बिजाक्षी राय (हेगडे), शिक्षकवर्ग ,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या उपस्थित होते. या क्रीडा संमेलनात शाळेच्या माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपली क्रीडाकौशल्ये,शिस्त व संघभावना प्रभावीपणे सादर केली. कॅप्टन निर्मल सिंग रंधावा यांनी आपल्या मार्गदर्शनपर मनोगतात सांगितले कि,खेळामुळे शारीरिक तंदुरुस्ती,मानसिक मजबुती,





आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि शिस्त विकसित होते.

जे केवळ शिक्षणासाठीच नव्हे तर भविष्यातील करिअरसाठी अत्यंत आवश्यक आहे. तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना भारतीय सैन्य, नौदल, हवाई दल, रेल्वे, पोलीस व इतर शासकीय सेवांमध्ये प्रवेशासाठी क्रीडांचे विशेष महत्त्व असल्याने क्रीडाक्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना शासकीय नोकऱ्यांमध्ये अतिरिक्त गुण,सवलती व विशेष संधी मिळतात. आज खेळात घेतलेली मेहनत उद्या देशसेवा आणि उज्ज्वल भविष्यासाठी मजबूत पाया ठरते, असे क्रीडांचे आपल्या जीवनातील अनेक महत्त्व सांगितले.

यावेळी उपस्थित मान्यवर पाहुण्यांच्या उपस्थितीमुळे विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा,शिस्त व देशसेवेबद्दल नवचैतन्य निर्माण झाले. एकूणच हे वार्षिक क्रीडा संमेलन विद्यार्थ्यांच्या ऊर्जे चे,संघभावनेचे व उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरणा देणारे ठरले.


**जाहीर नोटीस**

याद्वारे जाहीर नोटीस देण्यात येते की, माथेरान, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील भाडेपट्ट्याने प्रदान करण्यात आलेल्या भूखंडाचे भोगवतदार वर्ग २ ते वर्ग १ रुपांतरण करण्या या करिता श्री. प्रमोद देवराय नायक यांनी या कार्यालयात अर्ज दाखल केलेला आहे.

**भूखंडाचा तपशील**

| गावाचे नांव व तालुका | भूखंड क्रमांक | सि टी एस क्रमांक | क्षेत्र | सध्याचे पट्टेदाराचे नाव | मुदत संपण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| मौजे माथेरान, ता. कर्जत | माथेरान भूखंड क्रमांक बी.पी.८२ | ५०८ | ११३.७० चौ.मी. | प्रमोद देवराय नायक | ३१/०७/२०२८ |

त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, वरील भूखंडाबाबत भोगवतदार वर्ग २ ते वर्ग १ या बाबत कोणाचीही हरकत असल्यास, सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून पंधरा दिवसांत अशी हरकत अधीक्षक माथेरान, ता. कर्जत, जि. रायगड याजकडे आवश्यक कागदपत्रे/पुरावे यासह लेखी स्वरूपात सादर करणेत यावी. मुदतीत आलेल्या हरकती विचारात घेणेत येतील, याची नोंद घ्यावी.

शिक्का

**सही/–**
**(सुरेन्द्र ठाकूर)**
**अधीक्षक माथेरान**

**जाहीर नोटीस**

याद्वारे जाहीर नोटीस देण्यात येते की, माथेरान, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील भाडेपट्ट्याने प्रदान करण्यात आलेल्या भूखंडाचे भोगवतदार वर्ग २ ते वर्ग १ रुपांतरण करण्या या करिता श्री. सुधा प्रमोद नायक यांनी या कार्यालयात अर्ज दाखल केलेला आहे.

**भूखंडाचा तपशील**

| गावाचे नांव व तालुका | भूखंड क्रमांक | सि टी एस क्रमांक | क्षेत्र | सध्याचे पट्टेदाराचे नाव | मुदत संपण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| मौजे माथेरान, ता. कर्जत | माथेरान भूखंड क्रमांक बी.पी.२७ | २९२ | १८९.०० चौ.मी. | सुधा प्रमोद नायक | ३१/०७/२०२८ |

त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, वरील भूखंडाबाबत भोगवतदार वर्ग २ ते वर्ग १ या बाबत कोणाचीही हरकत असल्यास, सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून पंधरा दिवसांत अशी हरकत अधीक्षक माथेरान, ता. कर्जत, जि. रायगड याजकडे आवश्यक कागदपत्रे/पुरावे यासह लेखी स्वरूपात सादर करणेत यावी. मुदतीत आलेल्या हरकती विचारात घेणेत येतील, याची नोंद घ्यावी.

शिक्का

**सही/–**
**(सुरेन्द्र ठाकूर)**
**अधीक्षक माथेरान**

अॅड नित्यानंद ठाकूर

**जाहीर नोटीस**

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात**

दिवाणी चौ. अर्ज क्र.१६३०/२०२५
नि ७/ड

१. श्री. शशिकुमार तुवारा मोहन
वयः ६१ वर्षे धदा नोकरी
रा.रूम नं.७.पारिजात को.ऑ.हौ.
सो.लि. प्लॉट नं ५४ से.२१. खारघर
ता. पनवेल, जि रायगड

२. सौ. बीना मुरलीधरन नायर
वयः ५५ वर्षे धंदा गृहीणी, राहणार
मुरलीधरन नायर, रत्नावली को.ऑ.हौ.सो.लि.
गावठाण लेन, मुंबई, सांताकृझ (वेस्ट)

— अर्जदार

ज्याअर्थी अर्जदारांचे अर्जदारांची आई कै.शारदा मोहन ह्या दिनांक १२/१२/२०१७ रोजी मौजे रूम नं. ७. पारिजात को.ऑ.हौ.सो.लि., प्लॉट नं. ५४. से. २१. खारघर, तालुका पनवेल, जिल्हा– रायगड येथे मयत झालेल्या आहेत. तसेच त्यांचे पती कै. एम. के. मोहन हे दिनांक ३०/०७/२०१७ मौजे नवजीवन हॉस्पिटल, से. २१, खारघर, तालुका – पनवेल, जिल्हा रायगड येथे मयत झालेले आहेत.

कै, शारदा मोहन याचा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी प्रस्तूतचा अर्ज पनवेल येथील में सह दिवाणी न्या. वरिष्ठ, स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

कै, शारदा मोहन याचे अर्जदार नं १ व २ हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी वरील मुद्दतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख १७/१२/२०२५ रोजी माइया सही शिक्कयानिशी दिली.

**दिनांक : १८/१२/२०२५**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय, पनवेल**

# निवडणुकीसाठी नवी मुंबई मनपा सज्ज

## २८ प्रभागांसाठी ११४१ मतदान केंद्रे कार्यान्वित

**नवी मुंबई : बातमीदार**

विविध प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींशी नमुंमपा निवडणूकीविषयी सुसंवाद साधतांना आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी निवडणूक कार्यक्रमाची संपूर्ण माहिती दिली. नवी मुंबई महापालिकेची निवडणूक गुरुवार १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायं.५.३० यावेळेत होणार असून मतमोजणी शुक्रवार दि. १६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० पासून होणार असल्याची माहिती आयुक्तांनी दिली.

याकरिता १ जुलै २०२५ रोजीची मतदार यादी ग्राह्य धरण्यात आली असल्याची सांगत २३ डिसेंबर २०२५ ते २९ डिसेंबर २०२५ या कालावधीत सकाळी ११ ते दुपारी ३ तसेच ३० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत नामनिर्देशन पत्र दाखल करता येतील असे त्यांनी सांगितले. २५ डिसेंबर व २८ डिसेंबर रोजी नामनिर्देशन पत्रे देण्यात व स्विकारण्यात येणार नाहीत असे त्यांनी नमूद केले.

३१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वा. पासून नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात येणार असून त्यानंतर लगेचच वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी प्रसिध्द केली जाणार आहे. दि.०२ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी ०३ या वेळेपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार असून ३ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ नंतर निवडणूक चिन्ह नेमून दिले जाणार आहे. ३ जानेवारी रोजीच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द केली जाणार आहे व १५ जानेवारी रोजी निवडणूक होणार आहे असे त्यांनी सांगितले.

नमुंमपा निवडणूक १११ सदस्य संख्येकरिता होत असून २८ प्रभाग झालेले आहेत. त्यामध्ये २७ प्रभाग हे ४ सदस्यीय असून एक प्रभाग ३ सदस्यीय आहे. एकुण ९,४८,४६० इतकी एकूण मतदार संख्या असून त्यामध्ये ५,१६,२६७ पुरुष व ४,३२,०४० इतके स्त्री मतदार आणि १५३ इतर मतदार आहेत. यावेळी चार सदस्यीय प्रभाग असल्याने एका मतदारास चार सदस्यांना मतदान करावयाचे आहे, यादृष्टीने एका मतदान केंद्रावर जास्तीत जास्त ८०० ते ८५० मतदार असतील याकडे लक्ष देण्यात आलेले आहे. एकूण २८ प्रभागांसाठी ११४१ इतकी मतदान केंद्रे कार्यान्वित असणार आहेत. निवडणूक प्रक्रिया सुरळीतपणे रितीने पार पाडण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिका प्रशासन सज्ज असून या कामकाजासाठी आवश्यक असलेल्या ६ हजार २७५ कर्मचा-यांचे नियोजन करण्यात येत असल्याची माहिती आयुक्तांनी यावेळी दिली.



निवडणूकीकरिता आठ विभाग क्षेत्रासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांची कार्यालये स्थापित करण्यात आली असून प्र.क्र १,२,३ करिता माता बाल रुग्णालय इमारत दिघा या ठिकाणी व प्र.क्र ४,५,७ करिता सरस्वती विद्यालय से.५ ऐरोली याठिकाणी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय असणार आहे.

प्र.क्र.६,८,९ करिता समाजमंदिर हॉल. भूखंड क्र १०, से. ०७ घणसोली आणि प्रक्र १०,११,१२,१३ करिता आण्णासाहेब पाटील सभागृह, पहिला मजला, से. ५ कोपरखैरणे येथे कार्यालय असणार आहे. प्र.क्र. १४,१५,१९,२० याकरिता आण्णाभाऊ साठे समाजमंदिर, प्लॅट नं १८७ से.१० सानपाडा आणि प्र.क्र. १६,१७,१८ करिता जलतरण तलाव संकुल, भूखंड क्र १९६ से.१२ वाशी या ठिकाणी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय आहे.

प्र.क्र. २१,२२,२३,२४ करिता आगरी कोळी भवन, प्लॅट नं १२, से.२४, नेरुळ याठिकाणी तसेच प्र.क्र. २५,२६,२७,२८ करिता ए विभाग कार्यालय बेलापूर भवन, से.११, सीबीडी बेलापूर येथे निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय सुरु करण्यात आले आहे.

उमेदवारांना अर्ज दाखल करताना आवश्यक असणारी मालमत्ता कर, पाणीपट्टी तसेच इतर ना हरकत प्रमाणपत्रे एक खिडकी योजनेनुसार संबधित विभाग कार्यालय पातळीवरुन एकाच ठिकाणाहून देण्यात येतील असेही त्यांनी सांगितले.

सद्यस्थितीत आदर्श आचारसंहितेच्या अनुषंगाने अनाधिकृत बॅनर्स विरोधात धडक मोहीम हाती घेण्यात आली असून महानगरपालिकेच्या मालमत्तांसह शासकीय कार्यालये व इमारती तसेच सार्वजनिक व खाजगी जागांवरील राजकीय मजकूर हटविण्यात येत आहे. त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या मालमत्तांवरील उद्घाटन – भूमिपूजनाच्या कोनशिला तसेच राजकीय व्यक्तींची नावे असलेले फलक झाकून घेण्याची कार्यवाही तत्परतेने करण्यात आलेली आहे.

**मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी सक्रीय योगदान द्यावे व एका व्यक्तीस बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीनुसार २८ प्रभागांपैकी २७ प्रभागांत चार वेळा व एका प्रभागात तीन वेळा मतदान करावयाचे आहे. ही माहितीही जास्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहचविण्यासाठी संपूर्ण सहकार्य करावे.**


**–डॉ. कैलास शिंदे, आयुक्त, नवी मुंबई महापालिका**

### या अधिकाऱ्यांकडे जबाबदारी

निवडणूक प्रक्रिया सुनियोजित रितीने पार पाडण्यासाठी महानगरपालिकेच्या विभाग प्रमुखांना निवडणूक कामांच्या अनुषंगाने समन्वय अधिकारी म्हणून जबाबदारी देण्यात आली असून आवश्यक कामे करण्याकरिता कर्मचारीवर्गही उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. त्यामध्ये आचार सहिता अंमलबजावणी कक्षाचे समन्वयक अधिकारी म्हणून अतिरिक्त आयुक्त सुनील पवार काम पाहणार असून कायदा व सुव्यवस्था आणि सुरक्षा आराखडयाचे काम अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे पाहणार आहेत. मिडीया सेल व एमसीएमसी कमिटीचे समन्वयक अधिकारी म्हणून मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री.सत्यवान उबाळे काम पाहणार असून निवडणूक खर्च विषयक कामकाजाची जबाबदारी मुख्य लेखा परीक्षक राजेंद्र गाडेकर यांच्याकडे सोपविण्यात आलेली आहे. अशाप्रकारे सर्व विभाग प्रमुख अधिकाऱ्यांकडे निवडणूक विषयक विविध कामांच्या जबाबदाऱ्या सोपविण्यात आलेल्या आहेत.

# पोलिसांवरही असणार जीपीएस 'ट्रॅक'द्वारे वॉच

## वरिष्ठांना कळणार कर्मचाऱ्यांचे काम



**पनवेल : वार्ताहर**

पोलिस कर्मचारी दिलेला बंदोबस्त किंवा सोपवलेली जबाबदारी चोख निभावतात की नाही हे यापुढे जीपीएस 'ट्रॅक'द्वारे वरिष्ठ अधिकाऱ्यांना त्वरित कळणार आहे. बंदोबस्ताचे ठिकाण सोडून इतरत्र थांबण्याचे प्रकार टाळण्यासह बंदोबस्तामुळे गुन्हेगारी नियंत्रणात येते का? हेही या माध्यमातून पडताळले जाणार आहे. यासाठी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाने प्रायोगिक तत्त्वावर उपक्रम हाती घेतला असून, महिन्याभरात तो पूर्ण ताकदीने राबवला जाणार आहे.

काही कर्मचारी दिलेला बंदोबस्त चोखरित्या न बजावता भलत्याच ठिकाणी बसलेले असतात. याचा परिणाम गुन्हेगारी नियंत्रणात आणण्याच्या कामावरही होतो. रस्त्यावर पोलिस दिसले तरीही अनेकदा गुन्हेगारी कृत्याला आळा बसतो. हीच परिस्थिती वाहतूक पोलिसांच्या बाबतीतदेखील आहे. अनेकदा गुन्हेगारांच्या मागावर राज्यभरात किंवा राज्याबाहेर असलेल्या पोलिसांच्या सुरक्षेचाही प्रश्न गंभीर असतो. ते नेमके कोणत्या ठिकाणी व कोणत्या अवस्थेत आहेत याचीही क्षणाक्षणाची माहिती थेट पोलिस आयुक्तालयात नोंद होणार आहे. सध्या प्रायोगिक तत्त्वावर हा उपक्रम राबवला जात असून, त्यात समोर येणाऱ्या बाबी पडताळल्या जात आहेत.

अनेकदा बंदोबस्तावर नेमलेले पोलीस परस्पर गैरहजर राहण्याचे प्रकार घडत असतात. यामुळे कागदोपत्री नेमलेल्या बंदोबस्ताच्या ठिकाणी प्रत्यक्षात कोणीच हजर नसते किंवा निश्चित केलेल्या जागेऐवजी वेगळ्याच ठिकाणी कर्मचारी भलतेच कर्तव्य बजावत असतात. ट्रॅकमुळे वरिष्ठांना अपडेट समजणार असल्याने कामचुकारांना आळा बसणार आहे. गुन्हेगारी नियंत्रणासाठी नाकाबंदीचा केली जाते, मात्र एक मार्ग बंद झाला तरीही इतर मार्गांनी गुन्हेगार निसटू शकतात. अशा वेळी नाकाबंदीच्या नियोजनाचीही जुळवाजुळव जीपीएस ट्रॅकिंगच्या माध्यमातून होऊ शकते. त्यात कोणत्या ठिकाणी किती कर्मचारी हजर आहेत, हे तपासले जाणार आहे. तसेच यामुळे वाहतूक कोंडी प्रश्न सुद्धा निकाली निघणार आहेत.

# प्रश्नमंजुषा स्पर्धेत हर्ष ठाकूर प्रथम

**उरण : वार्ताहर**

पिरकोन येथे आयोजित उरण तालुका विज्ञान प्रदर्शनांतर्गत घेण्यात आलेल्या प्रश्नमंजुषा स्पर्धेत जुनिअर कॉलेजचा विद्यार्थी हर्ष जगदीश ठाकूर (इ. ११ वी विज्ञान, तुकडी – ब) याने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला आहे.

या यशामुळे संबंधित विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचितीस आली आहे. हर्षच्या या यशामागे प्रा. अरुण देवरे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

या उल्लेखनीय यशाबद्दल स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन कृष्णाजी कडू, स्कूल कमिटीचे सर्व सदस्य, विद्यालयाचे प्राचार्य बबन साळुंखे,



उपमुख्याध्यापिका संगीता थोरात,कार्यालयीन प्रमुख नितीन म्हात्रे,नवनीत ठाकूर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी हर्ष ठाकूर व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन करून त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.



**पनवेल : महापालिकेचे माजी नगरसेवक विजय चिपळेकर यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी राजेश गायकर, कामोठे शहरध्यक्ष विकास घरत, प्रदीप भगत, गोपीनाथ भगत, हर्षवर्धन पाटील, दामोदर चव्हाण, रमेश तुपे आदी उपस्थित होते.**

# वीर वाजेकर महाविद्यालयात कौशल विकास मार्गदर्शन

**उरण : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या, वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, फुंडे कौशल विकास मार्गदर्शन कार्यशाळा मोठया उत्साहात झाले. बारावी उत्तीर्ण विद्यार्थी व १८ ते ३० वयोगटातील सर्व तरुणांना नोकरीसाठी आवश्यक ते विविध प्रकारचे कौशल्य प्रशिक्षण वीर वाजेकर महाविद्यालयाच्या प्रांगणात प्रथम एज्युकेशन फाउंडेशन मार्फत मोफत उपलब्ध करून दिले जाणार आहे, याबद्दल माहिती करून देण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या वेळी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांनी विद्यार्थ्यांना आजच्या काळात व्यावसायिक शिक्षणाचे महत्त्व याबद्दल मार्गदर्शन केले. प्रथम एज्युकेशन फाउंडेशनचे सिनियर प्रोग्राम असोसियट नितीन अंब्रूले यांनी त्यांच्या मार्फत घेतले जाणाऱ्या कोर्स बद्दल ची माहिती विद्यार्थ्यांना दिली तसेच हे सर्व कोर्स मोफत कॉलेज मध्येच सुरु करण्याबद्दल ही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. जयवंती गोंधळी यांनी नर्सिंग कोर्स व हॉस्पिटॅलिटी कोर्स बद्दल ची पूर्ण माहिती तसेच कोर्स पूर्ण झाल्यानंतर जॉब मिळण्याचे आश्वासन दिले.

पुष्पा गायकवाड यांनीही विद्यार्थ्यांना मल्टी फंकशनल ऑफिस अटेंडट कोर्समध्ये कॉम्प्युटर, संभाषण, रेकॉर्ड, खरेदी इत्यादी सर्व बाबतीचे दिले जाणारे प्रशिक्षण याबद्दलची माहिती दिली. या प्रसंगी १५० विद्यार्थी, माजी विद्यार्थी व गरजू युवक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. झेलम झेंडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. प्रांजल भोईर यांनी व आभार प्रा. भूषण ठाकूर यांनी केले.



# माजी सैनिक राहूल पाटील यांचे एमपीएससीत यश



**उरण : बातमीदार, वार्ताहर**

उरण नगरपरिषदेच्या माँ साहेब मिनाताई ठाकरे वाचनालयात गेल्या दोन वर्षांपूर्वी तत्कालीन जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासिका सुरू करण्यात आली. आताच लागलेल्या एमपीएससी परिक्षेमध्ये माजी सैनिक राहूल पाटील यांनी यश मिळविले आहे.

राहूल पाटील यांचे कर निरिक्षक या पदा करिता निवड झाल्या बद्दल ग्रंथपाल संतोष पवार, सहाय्यक कर्मचारी जयेश वत्सराज, ॲड निरंतर सावंत आणि सर्व विद्यार्थी यांनी पुष्पगुच्छ आणि सुधाकर पाटील लिखीत झुंज क्रांतीवीरांचे हे पुस्तक देऊन सन्मानित केले. या वेळी राहूल पाटील यांनी उत्स्फूर्तपणे मनोगत व्यक्त करून सर्वांचे आभार मानले. राहुल पाटील यांनी सदर परिक्षेचा अभ्यास करण्यासाठी बेलापूर/नेरूळ या ठिकाणी असलेल्या लायब्ररी मध्ये जाण्या येण्यामध्ये खूप वेळ वाया जात होता. त्यावेळी त्यांच्या मित्रांनी उरण मधील माँ साहेब मीनाताई ठाकरे ग्रंथालयाचे नाव सुचवले. तेव्हा पासून ते अखंडीतपणे उरणमध्ये माँ साहेब मीनाताई ठाकरे वाचनालयात (ग्रंथालयात) अभ्यास करायला जात आहेत. त्यांच्या या यशाचे श्रेय त्यांनी माँ साहेब मीनाताई ठाकरे ग्रंथालयाला दिले आहे. या संधीचा फायदा उरण मधील विद्यार्थ्यांनी घ्यावा असेही त्यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले आहे.

त्याचप्रमाणे उरण नगर परिषदेने हि सेवा उपलब्ध करून दिल्याबद्दल उरण नगर परिषदेचे कर्मचारी संतोष पवार, सहकारी कर्मचारी जयेश वत्सराज आणि ॲड. निरंतर सावंत तसेच सर्व सहकारी विद्यार्थी यांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल समाधान व्यक्त केले.

# कामोठे येथे गटार झाकणे बसविण्याची कामे सुरू



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठे येथील सेक्टर ३४ परिसरातील अनेक ठिकाणी गटारांची झाकणे तुटून आतमध्ये गेल्यामुळे त्या भागात पाणी साचण्याची गंभीर समस्या निर्माण झाली होती. साचलेल्या पाण्यामुळे डासांचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव वाढून नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला होता. याबाबत स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत होती.

या समस्येसंदर्भात स्थानिक नागरिक राजेंद्र बोबडे, रवींद्र पाढी, विजय सरगर, बिल्डिंग प्रमुख सचिन वाक्षे तसेच अन्य रहिवाशांनी महानगरपालिका आणि माजी नगरसेवक तथा कामोठे भाजपचे शहरध्यक्ष विकास घरत यांच्याकडे तक्रारी दाखल केल्या होत्या. नागरिकांच्या या तक्रारीची गांभीर्याने दखल घेत सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर बुधवारी प्रत्यक्ष गटार झाकणे बदलण्याच्या कामास सुरुवात करण्यात आली आहे.

या संदर्भात विकास घरत यांनी पाठपुरावा केला होता. पनवेल महापालिकेचे संबंधित अधिकारी व नेमण्यात आलेल्या कॉन्ट्रॅक्टर यांच्या माध्यमातून सेक्टर ३४ परिसरातील तुटलेली व धोकादायक ठरलेली सर्व गटार झाकणे नव्याने बसवण्याचे काम तातडीने हाती घेण्यात आले असून हे काम लवकरच पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. या कामामुळे पाणी साचण्याची समस्या दूर होऊन परिसर स्वच्छ राहण्यास मदत होणार आहे, तसेच डासांचा प्रादुर्भाव कमी होऊन नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न सुटणार आहे.

या वेळी सामाजिक कार्यकर्ते रवी गोवारी, भाऊ भगत तसेच भाजप कामोठे मंडलचे उपाध्यक्ष रावसाहेब बुधे, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष नानासाहेब मगदूम, आगतराव मोटे आणि विलास पुकळे हे प्रत्यक्ष उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी नागरिकांच्या सहकार्याचे कौतुक करत महानगरपालिकेने अशा समस्यांकडे तातडीने लक्ष देण्याची गरज व्यक्त केली.

# फुंडे विद्यालयाची शैक्षणिक सहल उत्साहात

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य बी. बी. साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयाचे सहल विभाग प्रमुख ए. आर. म्हात्रे, उपशिक्षक डी. डी. पाटील, पी. ए. पाटील, एस. डी. नाईक. यांच्या सुंदर नियोजनाने विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल १२ व १६ डिसेंबर रोजी शिवनेरी, लेण्याद्री, ओझर या ठिकाणी गेली होती या सहली मध्ये एकूण ३०५ विद्यार्थी व



२८ शिक्षक सहभागी झाले होते.

विद्यार्थ्यांनी शिवनेरी किल्ला, लेण्याद्री व ओझर ही ठिकाणे पाहिली.सहलीचा उद्देश्य विद्यार्थ्यांना इतिहास, संस्कृती व धार्मिक वारसाची प्रत्यक्ष ओळख करून देणे हा होता. सकाळी शाळेतून बसने निघालेल्या विद्यार्थ्यांनी प्रथम शिवनेरी किल्ल्यास भेट दिली. शिवनेरी किल्ला हा छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान,किल्ल्यावरील प्रवेशदारे, तटबंदी, पाण्याच्या टाक्या व जिजामाता उद्यान पाहून महाराजांचे जीवन कार्य सांगितले त्या ठिकाणी शिवगर्जना गौरी बुरुंगे, सुमित बुरुंगले, पूर्वी आमुंगे व सहकारी यांनी एकच राजा येथे जन्माला या गीताचे सादरीकरण केले विविध गर्जनांनी शिवनेरी परिसर दुमदुमून गेला. ओझर येथील विघ्नहर गणपती मंदिराचे विद्यार्थ्यांनी दर्शन घेतले. भक्ती, श्रद्धा व सांस्कृतिक परंपरा याचे महत्व सांगितले.

लेण्याद्री हे एक ऐतिहासिक ठिकाण आहे. तेथे ३० बौद्ध लेणी आहेत. लेण्याद्री हे ज्यात अष्टविनायका पैकी एक असलेला गिरीजात्मज गणपतीचे मंदिर आहे त्या नंतर ओझर येथील विघ्नहार गणपती मंदिरात विद्यार्थ्यांनी दर्शन घेतले.

# माणगाव शहरातील अनधिकृत दुकाने अखेर तोडणार

## मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णायक निकाल नगरपंचायतीच्या बाजूने

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहराच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आणि दूरगामी परिणाम करणारा निकाल मुंबई उच्च न्यायालयाने दिला असून, मुंबई-गोवा महामार्गावरील अनधिकृत व बेकायदेशीर दुकाने तसेच अतिक्रमणे तात्काळ हटवून ती तोडण्याचे स्पष्ट आदेश न्यायालयाने दिले आहेत. या निकालामुळे अनेक वर्षांपासून अतिक्रमणांच्या विळख्यात अडकलेला महामार्ग अखेर मोकळा होण्याचा मार्ग मोकळा झाला असून, प्रशासनाच्या भूमिकेला न्यायालयीन पाठबळ मिळाले आहे.



माणगाव शहरातून जाणारा मुंबई-गोवा महामार्ग हा कोकणातील महत्त्वाचा दळणवळण मार्ग आहे. मात्र गेल्या अनेक वर्षांत महामार्गाच्या दुतर्फा अनधिकृत दुकाने, टपऱ्या आणि तात्पुरती बांधकामे उभी राहिल्याने वाहतूक कोंडी, अपघातांची भीती आणि शहराच्या नियोजनावर विपरीत परिणाम होत होता. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते जलाल यांनी या अतिक्रमणांविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या प्रकरणी सुनावणीदरम्यान न्यायालयाने यापूर्वीही संबंधित यंत्रणांना अतिक्रमणे हटवून महामार्ग मोकळा करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार महामार्ग कार्यालयाच्या वतीने माणगाव नगरपंचायत, जुन्या पंचायत समिती कार्यालयासमोरील भाग तसेच मुंबई-गोवा महामार्गालगत असलेल्या सर्व अनधिकृत दुकानदारांना वारंवार नोटीसा बजावण्यात आल्या होत्या. मात्र या नोटिसांकडे दुर्लक्ष करत दुकानदारांनी आपली दुकाने कायम ठेवली होती. या प्रकरणातील महत्त्वाचा मुद्दा असा होता की, संबंधित दुकाने नगरपंचायत,पंचायत समिती तसेच शासकीय जागेवर अनधिकृतरीत्या उभारण्यात आली होती. तथापि,काही दुकानदारांकडून नगरपंचायतमार्फत नाममात्र भाडे, पाणीपट्टी तसेच विविध कर वसूल करण्यात येत असल्याने आमची दुकाने अधिकृत असल्याचा दावा दुकानदारांनी न्यायालयात केला होता. पंचायत समिती व रायगड जिल्हा परिषदेकडूनही दुकान कर आकारला जात असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. मात्र, फक्त कर किंवा भाडे वसूल केल्याने अतिक्रमण अधिकृत ठरत नाही, हा महत्त्वाचा मुद्दा ग्राह्य धरत उच्च न्यायालयाने दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकून बुधवार,दि.१७ डिसेंबर रोजी माणगाव नगरपंचायतीच्या बाजूने स्पष्ट आणि ठाम निकाल दिला आहे. न्यायालयाने या सर्व अतिक्रमणांना अनधिकृत ठरवत तात्काळ हटवून ती तोडण्याचे आदेश दिले असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळाली आहे. या निकालामुळे माणगाव शहरातील शहररचना, वाहतूक व्यवस्थापन आणि महामार्गावरील सुरक्षितता यामध्ये बदल होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

दीर्घकाळ प्रलंबित असलेला हा प्रश्न अखेर न्यायालयीन निर्णयामुळे मार्गी लागला असून, आता प्रशासनाकडून प्रत्यक्ष कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, या निर्णयामुळे अनेक दुकानदारांवर उपजीविकेचा प्रश्न निर्माण होणार असला तरी कायद्याच्या चौकटीत शहराचा विकास, नागरिकांची सुरक्षितता आणि सार्वजनिक रस्त्यांचे संरक्षण महत्त्वाचे आहे, अशी प्रतिक्रिया नागरीकांनी दिली.

येत्या काळात माणगाव शहराचा मुंबई-गोवा महामार्ग अधिक मोकळा,सुरक्षित आणि शिस्तबद्ध दिसेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. या निकाला विरोधात माणगाव शहरातील दुकानदार सर्वोच्च न्यायालयात धाव घेऊन दाद मागणार आहेत.

# टोकेखार ते तुरंबाडी पुलाच्या कामास प्रारंभ

## १२०० कोटी खर्च करून पूल तयार होणार

**मुरुड जंजिरा : प्रतिनिधी**

कोस्टल हायवे महामार्गाचे काम सुरू झाले असून सर्वात प्रथम कोकणाला जोडल्या जाणाऱ्या तालुक्यांना पूल बांधून अधिक जवळ आणण्याचा प्रयत्न केला जात आहे.

राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी योजनेपैकी कोस्टल हायवे प्रकल्प असून रेवस ते रेड्डी हा महामार्ग तयार करून कोकण ते मुंबई अधिक जलद गतीने पोहोचणारा हा महामार्ग असणार आहे. या अती जलद महामार्गामुळे कोकणातील विविध पर्यटन स्थळे सुद्धा विकसित होऊन मोठ्या प्रमाणावर पर्यटक कोकणात दाखल होऊन स्थानिक लोकांना मोठा स्वयंरोजगार प्राप्त होणार आहे.माजी मुख्यमंत्री बॅरिस्टर ए.आर.अंतुले यांनी त्या काळात या महामार्गाची संकल्पना आणली होती. आज प्रत्यक्षात हे काम सुरू होत आहे.

या प्रकल्पात कोकण अधिक जवळ येण्यासाठी श्रीवर्धन मधील बाणकोट खडीवरील पूल, अलिबाग तालुक्यातील रेवदंडा पूल, रेवस करंजा पूल, मुरुड तालुक्यातील

आगरदांडा खाडीवरील टोकेखार ते तुरंबाडी पूल, व रत्नागिरी येथील अश्या पाच महत्वाचे पूल बांधून कोकणाच्या अगदी समीप पोहचण्याचा संकल्प करण्यात आला आहे. कोकणात फिरावयास येणारे मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली बोरीवली आदी भागातील पर्यटक यांना जलद गतीने कोकण ते मुंबई हे अंतर अवघ्या काही तासात गाठता यावे यासाठी रस्त्याची रुंदी वाढवून काँक्रिट रस्ते तयार करून हा महत्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण होणार आहे. येत्या दोन वर्षाच्या आत हे काम पूर्ण होईल असा कयास व्यक्त केला जात आहे.

रायगड जिल्ह्यातील रेवस करंजा, रेवदंडा, व तुरंबाडी पुलाची कामे जलद गतीने सुरू आहेत. त्याच प्रमाणे इतर पुलांच्या कामानी सुद्धा वेग घेतला आहे. टोकेखार ते तुरंबाडी पुलाचे अंदाजित रक्कम बाराशे कोटी रुपये पेक्षा जास्त खर्च होणार असून चार किलोमीटर अंतराचे संपूर्ण पुलाचे बांधकाम असणार आहे. या पुलामुळे मुरुड ते म्हसळा हे अंतर खूप जवळचे होणार आहे.

तुरंबाडी हे गाव म्हसळा तालुक्यात येत आहे. पुलाचे काम सुरू झाल्याने स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. आगरदांडा येथून जंगल जेट्टी द्वारे म्हसळा व श्रीवर्धन जल मार्गाने पोहचता येत होते.

परंतु सदरचा पूल झाल्यास जल मार्गव्यतिरिक्त रस्त्याचा उपयोग करून कधीही या दोन तालुक्यात अगदी सहज पोहचता येणार आहे. कोस्टल हायवे महामार्गामुळे अनेक तालुके व जिल्हे अगदी समीप येणार आहेत.

# श्रीवर्धन शहरात जड वाहतुकीला 'नो एन्ट्री'

## आराठी-बाळवटी मार्गावर कडक बंदी




**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन शहरातील वाढती वाहतूक कोंडी व सुरक्षिततेच्या प्रश्नांमुळे प्रशासनाने जड वाहतुकीवर बंदी घालण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार आराठी-बाळवटी मार्गावरून शहरात प्रवेश करणाऱ्या जड वाहनांना पूर्णतः मनाई करण्यात आली आहे.

या मार्गावरून बस, ट्रक, डंपर, आयसर, टेम्पो व टेम्पो-ट्रॅव्हल्स यांसारख्या जड वाहनांना प्रवेश निषिद्ध असून, शहरातील अरुंद रस्ते, वाढती गर्दी व अपघातांचे धोके लक्षात घेऊन ही बंदी लागू करण्यात आली आहे.बंदीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी बॅरिकेडिंग, सूचना फलक व पोलीस देखरेख ठेवण्यात आली असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर मोटार वाहन अधिनियमानुसार दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. या निर्णयाचे शहरातील नागरिकांनी स्वागत केले असून, सातत्याने व कठोर अंमलबजावणी करण्याची मागणीही केली जात आहे. प्रशासनाने जड वाहन चालकांना पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन केले आहे.

# भूमिपुत्रांच्या हक्कांसाठी टाटा पॉवर प्रशासनाविरोधात आमरण उपोषण सुरू

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील भिवपूरी येथील टाटा पॉवर प्रोजेक्ट मध्ये स्थानिकांनी केलेले उपोषण त्या दरम्यान त्यांच्या स्तरावरून स्थानिकांनी केलेल्या मागण्या आणि रोजगार या संदर्भातील देण्यात आलेले आश्वासन पूर्ण केले नसल्याने राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष तथा रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे, रायगड जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती नारायण डामसे, यांनी स्थानिकांच्या न्याय हक्कासाठी टाटा पॉवर प्रोजेक्ट प्रशासनाच्या विरोधात आमरण उपोषणास सुरू केले आहे.



कर्जत तालुक्यातील भिवपूरी येथील टाटा पॉवर स्टोरेज वीज प्रकल्पाविरोधात स्थानिक ग्रामस्थ आपल्या न्याय हक्कासाठी प्रमुख मागण्या घेऊन दि. ६ ऑक्टोबर रोजी साखळी उपोषणास बसले होते. मात्र उपोषणाच्या दोन दिवसानंतर टाटा पॉवर यांचे आश्वासनानुसार अखेर बुधवारी दि. ०८ ऑक्टोबर रोजी सदर साखळी उपोषण हे स्थगित करण्यात आले होते. यावेळी टाटा पॉवर प्रकल्प अधिकारी वर्गाने भिवपूरी ग्रामस्थाशी केलेल्या चर्चे अंती स्थानिक ग्रामस्थांनी केलेल्या अनेक मागण्या लेखी स्वरूपात मान्य करण्यात आल्या असल्याने हे आंदोलन स्थगित करण्यात आले होते.

ज्या घरांची पडझड झाली आहे त्या धनगरवाडीतील घरांना संयुक्त तपासणीनंतर दुरुस्ती करण्याबाबत ठोस पाऊल उचलले जाणार असल्याचे टाटा पॉवर प्रकल्पाने आंदोलनकर्त्या ग्रामस्थांना दिलेल्या लेखी आश्वासनातून दिले होते.

मात्र कंपनीकडून त्या आश्वासनाची पूर्ति होत नसल्याने, व पिडित स्थानिक ग्रामस्थांचे तोंडाला पाने पुसण्याचे काम हे कंपनीच्या माध्यमातून होत असल्याने दि. १७ डिसेंबर रोजी सकाळी ११.०० वाजता टाटा पावर प्रोजेक्टच्या गेट भिवपुरी कॅम्पच्या गेटवर आमरण उपोषण सुरु केले.

# 'मनोरंजनातून तणाव मुक्ती, कामासाठी नवी ऊर्जा मिळते'

**धाटाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित (महावितरण) पेण मंडळामार्फत आयोजित सोहळा मनोरंजनाचा कार्यक्रम बुधवारी रोह्यात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. मनोरंजन उपक्रमांमुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मनातील ताणतणाव दूर होऊन अधिक जोमाने काम करण्याची ऊर्जा निर्माण होते, असे प्रतिपादन भांडुप परिमंडळाचे मुख्य अभियंता संजय पाटील यांनी केले.



वर्षभरात क्रीडा स्पर्धा, सुरक्षा सप्ताह तसेच मनोरंजनात्मक कार्यक्रमांच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण केले जाते. महावितरणचे काम हे अत्यंत जबाबदारीचे व तणावपूर्ण असून कार्यालयीन काम करणाऱ्यांना क्षेत्रातील काम सोपे वाटते, तर रात्री-अपरात्री लाईनवर काम करणाऱ्यांना कार्यालयीन काम सोयीचे वाटते. अधिकारी वर्गालाही सातत्याने बैठका व वरिष्ठ कार्यालयांचे फोन यांचा सामना करावा लागतो. ग्राहकांना २४ तास अखंडित वीजपुरवठा देताना सर्वांनाच मानसिक तणाव सहन करावा लागतो. अशा परिस्थितीत एकत्र येऊन साजरे होणारे कार्यक्रम मनाला दिलासा देणारे ठरतात, असे संजय पाटील यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले. या कार्यक्रमाला पेण मंडळाचे अधीक्षक अभियंता धनराज बिक्कड, सहा. महाव्यवस्थापक नमिता गजदर, कार्यकारी अभियंता प्रदीप डाळू, रामकृष्ण पाटील, शैलेशकुमार सिंह, विद्यासागर शिंदे, उमेश चव्हाण, प्रवीण साळी, पेण मंडळ व्यवस्थापक संगीता गंभीर, महेश म्हात्रे, महेंद्र बागुल, जतीन पाटील, अजय आभाले यांच्यासह अधिकारी, कर्मचारी, त्यांचे कुटुंबीय व ठेकेदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महावितरणचे अधिकारी व कर्मचारी ऊन, वारा, पाऊस तसेच रात्री अपरात्री जीवाची पर्वा न करता जनतेला अखंडित सेवा देण्यासाठी सदैव तत्पर असतात. अशा कर्मचाऱ्यांना कुटुंबासोबत वेळ घालवता यावा व कामाचा ताण कमी व्हावा, या उद्देशाने रोह्यातील सी. डी. देशमुख नाट्यगृह येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन छ. शिवाजी महाराजांना पुष्पमाला अर्पण करून करण्यात आली. प्रास्ताविक कार्यकारी अभियंता प्रदीप डाळू यांनी केले. अधीक्षक अभियंता धनराज बिक्कड यांनी मार्गदर्शन करताना, स्थापनेच्या सुरुवातीच्या काळात कंपनीचे खासगीकरण होईल अशी भीती होती, मात्र नवे तंत्रज्ञान आत्मसात करत महावितरणने दर्जेदार सेवा देण्यात यश मिळवले, असे सांगितले. या वेळी डॉ. दत्ता कोहीनकर यांनी 'मनाची अमर्याद शक्ती व ताणतणाव व्यवस्थापन' या विषयावर मार्गदर्शन केले.

# 'जागेपणी पाहिलेली स्वप्ने देशाच्या प्रगतीसाठी सत्यात उतरवणे महत्त्वाचे'

**चौक : प्रतिनिधी**

रात्री झोपेत पडलेली स्वप्ने बघण्यापेक्षा जागेपणी स्वप्ने पाहून देशाच्या प्रगतीसाठी ती स्वप्ने सत्यात उतरवून देशाचा सर्वांगीण विकास साधावा, असे आवाहन युवा नेते प्रसाद थोरवे यांनी केले आहे.







शिक्षण विभाग पंचायत समिती खालापूर व खालापूर तालुका गणित, विज्ञान अध्यापक मंडळ व जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था पनवेल यांचे हिमांशु दिलीप पाटील इंग्रजी माध्यम शाळा नढाळ चौक यांच्या संयुक्त विद्यमाने जे एम म्हात्रे स्कूल शाळेत आयोजित ५३ वे तालुका विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन आमदार महेंद्र थोरवे यांचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित असलेले प्रसाद थोरवे यांच्या हस्ते करण्यात आले, त्या प्रसंगी ते बोलत होते.ते पुढे म्हणाले तंत्रज्ञान,विज्ञान, गणित अशा विषयांबरोबर देश, राज्य यांचा कारभार हाताळणारे प्रशासनातील शिक्षण शाळेतून दिले पाहिजे. अशा प्रदर्शनाने देशाचे भावी शास्त्रज्ञ तयार होतील अशी अपेक्षा व्यक्त केली. विज्ञान प्रदर्शनाचा मुख्य विषय विकसित आणि आत्मनिर्भर भारतासाठी ڈढएच् हा होता. प्रदर्शनाचे उद्घाटन आधुनिक तंत्रज्ञान वापरून केल्याने देशाच्या प्रगतीचा आलेख वाढला आहे असे दिसते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गट शिक्षण अधिकारी दीपा परब गवस यांनी करून मुख्यमंत्री माझी शाळा, शाळांच्या प्रगतीचा आढावा, विद्यार्थी यांनी दिलेल्या स्पर्धा परीक्षा आणि एकंदर तालुक्यात होत असलेली शिक्षण प्रगती याचा आढावा दिला. त्या नंतर युवा नेते प्रसाद थोरवे यांनी विज्ञान प्रदर्शनाला भेट देऊन प्रत्येक प्रतिकृतीची माहिती घेतली व बाल वैज्ञानिकांचे, विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

या वेळी कनिष्ठ अधिकारी देवीदास पाडवी, मुख्याध्यापिका निशा पोळ, तालुका विज्ञान अध्यापक मंडळ सुखदेव आव्हाड, सचिव राजेंद्र गावडे खजिनदार ज्ञानदेव बिचकर अर्पिता चव्हाण यांच्यासह शिक्षक विद्यार्थी उपस्थित होते.

# माणगावच्या स्वरा बामगुडेची रायगड जिल्हा क्रिकेट संघात निवड

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहराच्या क्रीडा आणि शैक्षणिक क्षेत्राला अभिमान वाटावा अशी आनंदाची बातमी समोर आली आहे. माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या सुधाकर नारायण शिपुरकर व गणेश यशवंत वाघरे इंग्रजी माध्यम शाळेची माजी विद्यार्थिनी, कुमारी स्वरा नंदिनी नितीन बामगुडे हिची रायगड जिल्हा मुलींच्या क्रिकेट संघात निवड झाली कठोर परिश्रम, शिस्त आणि जिद्दीच्या जोरावर जिल्हास्तरावर आपले नाव कोरणे ही केवळ वैयक्तिक नव्हे, तर संपूर्ण शहरासाठी प्रेरणादायी यशकथा ठरली आहे.



स्वरा ही केवळ उत्कृष्ट क्रिकेटपटूच नाही, तर अभ्यासातही तितकीच चमकदार आहे. इयत्ता दहावीच्या परीक्षेत ९५ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावणारी स्वरा सध्या नवी मुंबईच्या नेरुळ येथील डॉ. डी. वाय. पाटील कॉलेजमध्ये उच्च शिक्षण घेत आहे. शिक्षणासोबत क्रीडा क्षेत्रातही आपली वाटचाल ती तितक्याच आत्मविश्वासाने करत असून, येथील भव्य स्टेडियममध्ये भारत रत्न 'मास्टर ब्लास्टर' सचिन तेंडुलकर क्रिकेट अकॅडमीत ती नियमित सराव करत आहे. माणगाव येथील शिपुरकर व वाघरे शाळेत शिक्षण घेत असतानाच स्वराने क्रिकेटची स्वप्ने पाहायला सुरुवात केली. पहाटे सकाळी सहा वाजता धनसे मैदानावर घाम गाळत घेतलेले क्रिकेटचे प्राथमिक धडे आज तिच्या यशाचा मजबूत पाया ठरले आहेत. या प्रवासात शाळेच्या व्यवस्थापनाने, शिक्षकांनी आणि क्रीडा प्रशिक्षकांनी तसेच आई नंदिनी व वडील नितीन बामगुडे यांनी तिला वेळोवेळी प्रोत्साहन देत तिच्या स्वप्नांच्या पंखांना बळ दिले. सध्या नवी मुंबई येथे दररोज तीन सत्रांत कठोर सराव करत असलेली स्वरा ही यष्टिरक्षक आणि आघाडीची फलंदाज असल्याने ती दुहेरी मेहनत घेत आहे. तिच्या खेळातील सातत्य, तांत्रिक कौशल्य, आत्मविश्वास आणि जिद्द पाहून महाराष्ट्र राज्य क्रिकेट निवड समितीने तिला रायगड जिल्हा क्रिकेट संघात महत्त्वाचे स्थान देत माणगावच्या या उदयोन्मुख प्रतिभेचा गौरव केला आहे.



**चौक : मुरूड खोरा बंदरात हिवाळी शाळेच्या सहली जंजीरा किल्ला पहाण्यासाठी मोठ्या प्रमाणात येत आहेत. खोरा बंदराला प्रत्येक दिवशी सुमारे २५ बस भेट देत आहेत. त्यामुळे पर्यटकांची गर्दी पहायला मिळत आहे.**

# लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सवानिमित्त डॉजबॉल स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या एमएनएम विद्यालयात संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्ष पदार्पणानिमित्त अमृत चषक तालुकास्तरीय डॉजबॉल व रीले स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

स्पर्धेमध्ये जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या संस्थेच्या संलग्न शाळा तसेच तालुक्यातील विविध शालेय संघातील २०० स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. अमृत चषक डॉजबॉल स्पर्धेचे उद्‌घाटन स्पर्धेचे प्रमुख अतिथी संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी कार्यकारी मंडळ सदस्य ॲड. राहुल घरत, गव्हाणचे माजी उपसरपंच विजय घरत, ॲड. योगिता भगत, जयवंत देशमुख,



अनंता ठाकूर, सुधीर ठाकूर, संस्थेचे इंजिनियर दर्शन ठाकूर, रघुनाथ देशमुख कमलाकर देशमुख, विजेंद्र पाटील यांनी स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या.

या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी विद्यार्थ्यांना तालुकास्तरीय डॉजबॉल स्पर्धा आयोजनाबद्दल समाधान व्यक्त करत या स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांचे शारीरिक कौशल्य विकसित होत असून त्यांच्या क्रीडा कौशल्य, सांघिक वृत्ती, खेळाडू वृत्ती नेतृत्व गुण, निडरपणा, लढाऊ वृत्तीचा विकास होण्यासाठी या स्पर्धा नेहमीच पोषक असतात असे अधोरेखित केले.

१४ वर्षाखालील मुलींच्या रिले (4X100) गटामध्ये सिकेटी इंग्लिश मीडियम शाळेने प्रथम क्रमांक पटकावला आणि भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयाने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. १४ वर्षाखालील मुलांच्या (4X 100) गटांमध्ये एमएनएम न विद्यालयाने प्रथम क्रमांक. तसेच सीकेटी मराठी माध्यम शाळेने द्वितीय क्रमांक पटकावला. डॉजबॉल १९ वर्षाखालील मुलींच्या गटामध्ये सीकेटी ज्युनिअर कॉलेज पनवेल यांनी प्रथम क्रमांक, एमएनएम विद्यालय गव्हाण यांनी द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

मुलांच्या डॉजबॉल स्पर्धेमध्ये एमएनएम विद्यालयाने प्रथम क्रमांक तसेच सीकेटी इंग्लिश मीडियम स्कूल द्वितीय क्रमांक प्राप्त केला. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल शाळेचे चेअरमन भार्गव ठाकूर, शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर, शाळेच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका प्रणिता गोळे, पर्यवेक्षक अरुण जोशी, आदींनी विजेत्या स्पर्धकांचे कौतुक केले.

क्रीडा शिक्षक वामन कुराडे, क्रीडा शिक्षिका वर्षा नलावडे यांनी कार्यक्रमाचे नियोजन करत कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले. स्पर्धेचे धावते वर्णन अविनाश कजबजे, संतोष पवार व राहुल म्हात्रे यांनी केले.

## एमसीए निमंत्रित क्रिकेट स्पर्धा

# पेणमध्ये हिंगोली संघाचा विजय

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या १९ वर्षाखालील मुलांच्या दोनदिवसीय कसोटी फॉरमॅट क्रिकेट स्पर्धेतील पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर झालेल्या सामन्यात हिंगोली जिल्हा क्रिकेट असो संघाने बीड जिल्हा क्रिकेट असो. संघाचा आठ गडी राखून दणदणीत विजय मिळवला आहे.

नाणेफेकीचा कौल जिंकत प्रथम फलंदाजी करतांना बीडच्या संघाने पहिल्या डावात सर्व गडी बाद १५५ धावा केल्या त्यामध्ये श्रेयस खटाळ यांनी सर्वाधिक ८२ धावा काढल्या हिंगोली संघाकडून कर्णधार ओंकार मोगल यांनी पाच तर सम्यक बागुल यांनी ३ फलंदाज बाद केले. हिंगोली संघाने पहिल्या डावात १५९ धावा काढून ४ धावांची आघाडी घेतली होती त्यामध्ये सम्यक बागुल यांनी सर्वाधिक ८२ धावा काढल्या, बीडच्या संघाकडून कृष्ण बिडवे यांनी ६ फलंदाज बाद केले. बीड संघाने दुसऱ्या डावात फलंदाजीत ९ गडी बाद १३३ धावसंखेवर डाव घोषित केला. हिंगोली संघाकडून ओंकार मोगल यांनी सहा फलंदाजांना बाद केले.

दुसऱ्या दिवसाचा खेळ संपायला ४५ षटके शिल्लक असताना १२९ धावांचे लक्ष बीडच्या संघाने ठेवले होते. सलामीवीर तंत्रशुद्ध फलंदाज सोहम सरगर यांनी ५८ तर कर्णधार ओंकार मोगल यांनी सर्वाधिक ६६ धावांची खेळी करत संघाला आठ गडी राखून दणदणीत विजय मिळवून दिला आहे. प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध उद्योजक राजू पिचिका, पेण स्पोर्ट्स असो. चे अध्यक्ष अरुण शिंदे, प्रदीप पाटील, प्रफुल्ल टेमघरे, देवेंद्र पाटील, दिनेश सावंत, शेखर भगत, अभिषेक खातू उपस्थित होते.



# सीकेएसके ताफ्यात घेतल्यानंतर सरफराज खानची इमोशनल पोस्ट!

**मुंबई : प्रतिनिधी**

देशांतर्गत क्रिकेटमध्ये धावांचा पाऊस पाडूनही लिलावाच्या पहिल्या फेरीत अनसोल्ड राहिलेल्या सरफराज खानला अखेर महेंद्रसिंह धोनीच्या चेन्नई सुपर किंग्ज संघाने ७५ लाखांच्या मूळ किमतीत आपल्या ताफ्यात दाखल करून घेतले. या निर्णयानंतर सरफराज खान अत्यंत भावूक झाला असून त्याने सीएसके आपल्याला नवीन आयुष्य दिल्याचे त्याने म्हणत आभार मानले आहेत.

लिलावाच्या काही तास आधीच सरफराजने सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये आपल्या बॅटने धमाका केला. त्याने अवघ्या २२ चेंडूत ७३ धावांची स्फोटक खेळी करत सर्वांचे लक्ष वेधले होते. याच तुफानी फॉर्मची दखल घेत सीएसकेने त्याच्यावर विश्वास दाखवला. २०२३नंतर आयपीएलमधून बाहेर असलेल्या सरफराजसाठी ही एक नवीन सुरुवात मानली जात आहे.




सीएसकेच्या संघात निवड झाल्यानंतर सरफराजने इन्स्टाग्रामवर एक भावूक स्टोरी शेअर केली. मला नवीन आयुष्य दिल्याबद्दल धन्यवाद, असे त्याने लिहिले. महत्त्वाचे म्हणजे देशांतर्गत क्रिकेटमध्ये सातत्याने मोठी कामगिरी करूनही त्याला आयपीएलमध्ये फारशी संधी दिली जात नव्हती, मात्र आता आयपीएलमधील सर्वात यशस्वी संघांपैकी एक असलेल्या सीएसकेचा पाठिंबा मिळाल्याने त्याचा आत्मविश्वास उंचावला आहे.

# धुक्यामुळे भारत-द. आफ्रिका यांच्यातील चौथा सामना रद्द

**लखनौ : वृत्तसंस्था**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील लखनौच्या मैदानातील सामना धुक्याच्या प्रभावामुळे रद्द करण्याची वेळ बुधवारी आली. क्रिकेटच्या सामन्यात इतिहासात आतापर्यंत पावसाच्या व्यत्ययामुळे सामना रद्द झाल्याचे अनेकदा पहायला मिळाले आहे, पण धुक्यामुळे आंतरराष्ट्रीय सामना एकही चेंडू न खेळवता रद्द करण्याची ही पहिलीच वेळ ठरली.

सामना रद्द झाल्यामुळे चाहत्यांची घोर निराशा झालीच, पण शुबमन गिलच्या अनुपस्थितीत संजूसाठी प्लेइंग इलेव्हनची जी संधी निर्माण झाली होती तीही गेली. आता या मालिकेचा निकाल जगातील सर्वात मोठ्या अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर लागणार आहे.



भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेतील पहिल्या तीन सामन्यातील दोन विजयांसह मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली आहे. लखनौचे मैदान मारत भारतीय संघाला मालिका विजयाची संधी होती, पण हा सामना रद्द झाला आहे.

भारतीय संघाने पाचवा आणि अखेरचा सामना गमावला तर मालिका २-२ बरोबरीत सुटेल. याचा अर्थ दक्षिण आफ्रिकेचा संघाने शेवटचा सामना जिंकला तरी त्यांना मालिका आपल्या नावे करता येणार नाही. याउलट भारतीय संघाकडे अजूनही शेवटचा सामान जिंकून मालिका जिंकण्याची संधी आहे.

भारत-दक्षिण आफ्रिका यांच्यातील सामना सायंकाळी ७ वाजता नियोजित होता. त्याआधी ६ वाजून ३० मिनिटांनी नाणेफेकीसाठी दोन्ही कर्णधार मैदानात येतील, अशी अपेक्षा होती. पंचांनी ६ वाजून ५० मिनिटांनी मैदानात येऊन निरीक्षण केले. त्यानंतर ७ वाजून ३० मिनिटांनी पुन्हा निरीक्षण करण्यात आले. नऊ वाजेपर्यंत पंचांकडून अर्ध्या तासाला हा खेळ पहायला मिळाला. शेवटी पंचांनी सामना रद्द झाल्याची घोषणा केली.

# टी-२० क्रमवारीत तिलक वर्माची झेप

**दुबई : वृत्तसंस्था**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत दमदार कामगिरी केल्याचा तिलक वर्माला आयसीसीच्या टी-२० क्रमवारीत फायदा झाला आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेन नुकत्याच जाहीर केलेल्या टी-२० क्रमवारीत त्याने दोन स्थानांनी झेप घेतली आहे.

भारताचा स्फोटक युवा फलंदाज अभिषेक शर्मा दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेत मोठी खेळी करू शकलेला नाही. सातत्यपूर्ण कामगिरीसह तो आपले अव्वलस्थान कायम ठेवून आहे. त्याच्या खात्यात ९०९ रेटिंग पॉइंट्स जमा आहेत. त्याच्यापाठोपाठ यादीत इंग्लंडच्या फिल सॉल्टचा नंबर लागतो. ८४९ रेटिंगसह तो दुसऱ्या स्थानी आहे. पथुम निसंका ७७९ रेटिंगसह तिसऱ्या, तर ७७४ रेटिंगसह तिलक वर्मा चौथ्या स्थानावर आहे.

तिलक वर्माने चौथ्या स्थानावर झेप घेतल्यावर इंग्लंडच्या जोस बटलरसह पाकिस्तान साहिबजादा फरहानला फटका बसला आहे. बटलर एका स्थानाच्या घसरणीसह ७७० रेटिंगसह पाचव्या स्थानावर आहे. पाकचा साहिबजादा ७५२ रेटिंगसह सहाव्या क्रमांकवर आहे. याशिवाय भारतीय टी-२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव याच्यावर टॉप १०मधून बाहेर पडण्याची टांगती तलवार लटकताना दिसते. एकेकाळी रँकिंगमध्ये अव्वल स्थानी असणारा सूर्या आता थेट दहाव्या क्रमांकावर फेकला गेला आहे. सध्या त्याचे रेटिंग ६६९ असून तो टॉप-१०च्या सीमेवर उभा आहे.

# तालुकास्तरीय डॉजबॉल स्पर्धेत ‘सीकेटी’च्या संघांची चमक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व तुकाराम नारायण घरत ज्युनिअर कॉलेज गव्हाण कोपर (उलवे) येथे संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त तालुकास्तरीय आंतरशालेय डॉजबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत नवीन पनवेल येथील सीकेटी उच्च माध्यमिक विद्यालयातील १९ वर्षाखालील मुलींच्या संघाने प्रथम, तर मुलांच्या संघाने द्वितीय क्रमांक पटकावला.



या दोन्ही संघांनी डॉजबॉल स्पर्धेत केलेल्या चमकदार कामगिरीबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे व स्वाती पाटील, क्रीडा शिक्षक अरुण पाटील, मनोज पाटील आदींनी दोन्ही संघाचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# बेणसे गावच्या श्रुती गायकरची आंतरराष्ट्रीय बँडी शिबिरासाठी निवड

**पाली : प्रतिनिधी**

नुकत्याच डेहराडून येथे पार पडलेल्या ७ व्या राष्ट्रीय स्तरावरील बँडी स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुलींच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत द्वितीय क्रमांक पटकावून रौप्यपदक मिळवले.

या उल्लेखनीय यशानंतर संघातील खेळाडू श्रुती दत्ताराम गायकर हिची जानेवारी महिन्यात डेहराडून येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय बँडी शिबिरासाठी निवड झाली असून, हा तिच्या क्रीडा कारकिर्दीतील एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

श्रुतीने आपल्या यशाचे श्रेय



प्रशिक्षक संजय गमरे सर यांना दिले. त्यांनी केवळ तांत्रिक प्रशिक्षणच नाही तर आर्थिक मदत देऊनही तिच्या राष्ट्रीय स्पर्धेतील सहभागाला मोलाचा आधार दिला.

तिच्या या यशामागे RESULT GYM, माजगाव यांचे अत्यंत महत्त्वाचे योगदान आहे. RESULT GYM मधील व्यावसायिक फिटनेस प्रशिक्षणामुळे श्रुतीला जुन्या दुखापतींमधून सावरणे, शारीरिक ताकद वाढवणे तसेच स्टॅमिना व चपळता सुधारण्यास मोठी मदत झाली. उच्च दर्जाच्या फिटनेस व रिहॅबिलिटेशन प्रशिक्षणामुळेच ती राष्ट्रीय पातळीवर सर्वोत्तम कामगिरी करू शकली.

तिने आपल्या स्केटिंग प्रशिक्षिका अदिती माळी यांचेही विशेष आभार मानले. त्यांच्या सातत्यपूर्ण तांत्रिक मार्गदर्शनामुळे व नियमित सरावामुळे (प्रचिती गायकर यांच्या सहकार्याने) तिच्या खेळात सातत्य व आत्मविश्वास वाढला. सध्या आर्थिक अडचणी असतानाही, कुटुंबीय, जवळचे मित्र, प्रशिक्षक व शुभेच्छुकांचा मिळणारा पाठिंबा तिला अधिक मजबूत बनवत असल्याचे श्रुतीने सांगितले. आगामी आंतरराष्ट्रीय संधींसाठी ती जोरदार तयारी करत असून, भविष्यातही असेच पाठबळ मिळावे, असे आवाहन तिने केले.

# एमएनएम विद्यालयात वार्षिक क्रीडा महोत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शालेय विद्यार्थ्यांचे अंगीभुत शारीरिक कौशल्य, सांघिक वृत्ती, नेतृत्व गुण, क्रीडा कौशल्य विकसित करणाऱ्या एमएनएम विद्यालयात शालेय वार्षिक क्रीडा महोत्सवाचे शानदार उद्‌घाटन जनार्दन भगत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते उडान म्हणजेच विद्यार्थ्यांच्या क्रीडा कौशल्यांना प्राप्त झाले नवीन पंख या नावीन्यपूर्ण शीर्षकाने करण्यात आले.

शाळेचे चेअरमन भार्गव ठाकूर यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष तसेच जनार्दन भगत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत यांचे स्वागत केले. शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर यांनी मॅनेजिंग कौन्सिल सदस्य राहुल घरत, गव्हाण ग्रामपंचायतचे माजी



उपसरपंच विजय घरत, योगिता भगत, अनंता शेठ ठाकूर, संस्थेचे अभियंता दर्शन ठाकूर, यांचे स्वागत केले. क्रीडा स्पर्धेदरम्यान क्रीडा ज्योतीचे प्रज्वलन करण्यात आले.

जिल्हास्तरीय वैयक्तिक स्पर्धांमध्ये पदक विजेत्या विद्यार्थ्यांनी क्रीडा ज्योत मैदानावर फिरविली. शाळेचा विद्यार्थी प्रमुख मेघराज पहाडी याने सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा शपथ दिली. शाळेच्या विविध कुलातील विद्यार्थ्यांनी शानदार संचलन केले करत पाहुण्यांना सलामी दिली. विद्यार्थिनींनी झुंबा नृत्य, गणेश नृत्य तसेच पूर्व प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांचे संगीतमय कवायत प्रकाराने सर्वांचे लक्ष वेधून घेतले याप्रमाणेच महाराष्ट्रातील मातीतील शिवकालीन लाठीकाठी खेळाचे शानदार प्रदर्शन करण्यात आले..

संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी विद्यार्थ्यांना खेळाडू वृत्तीने, संयमाने, खेळत असताना शिस्तीचे महत्व सांगितले. विद्यालयाच्या विविध तालुकास्तरीय जिल्हास्तरीय तसेच विभाग स्तरीय विविध स्पर्धेतील अर्जित केलेल्या पदकांबद्दल विद्यार्थ्यांची प्रशंसा करत प्रगतीचा आलेख उच्च स्तरावर नेऊन शाळेचा नावलौकिक वाढवावा, असे सांगितले.

कार्यक्रमास जयवंत देशमुख, रघुनाथ देशमुख, कमलाकर देशमुख, श्रीकांत घरत, मीनाक्षी पाटील, शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका प्रणिता गोळे, प्राथमिक विभागाचे पर्यवेक्षक श्री अरुण जोशी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना क्रीडा दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

क्रीडाशिक्षक वामन कुराडे, क्रीडा शिक्षिका वर्षा नलावडे यांनी कार्यक्रमासाठी विशेष परिश्रम घेत मैदानाची आखणी, विविध क्रीडा स्पर्धांचे नियोजन करत कार्यक्रम सुरळीत होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन दिपाली कोल्हे, परेश पावस्कर यांनी केले.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com